योगसारसंग्रह संस्कृत-मराठी सौ.मानसी वैद्य,ठाणे

॥ योगसारसंग्रहः ॥ योगसारसंग्रह

प्रणमामि गणेशानं प्रणवार्तिप्रभञ्जनम्।प्रसन्नं भजतामिष्ट प्रदातारं भवच्छिदम्॥

ॐकाररुपी(मूळशब्द) जो गणेश,जो अतिशय गतिमान (गतीने मूळस्वरुपाकडे नेणारा) आहे.त्यास नमस्कार असो ज्याचे गोड भजन केल्याने तो प्रसन्न होऊन इच्छित फळ देतो.

सुधांशुकोटिद्युतिमप्रमेयं सुधाकरस्मरे मुखारविन्दम्। योराजयोगामृतदान दक्षं श्रीदक्षिणामूर्ति गुरुं नमामि॥

ज्ञान(ज्ञानाचे सार) प्राप्त करण्यासाठी ज्ञानाने तेजपुंज: व चंद्राप्रमाणे शितल अशा मुख्य(श्रेष्ठ) दक्षिणेकडील गुरु (गोविंद) यांस नमन करतो,ज्यांच्या कृपेने योगातील ज्ञानामृत (ज्ञान) प्राप्त होईल.

श्रीशङ्करं पराशक्तिं गणेशं षण्मुखंहरिम्। ब्रह्माणं नन्दिकेशं च दत्तात्रेयं पतञ्जलिम्॥

पराशक्तीरूप शिव,षड(सहा)मुखी हरिरूप म्हणजे गणेश,नंदिस्वरूप(आनंदमय,प्रजापतींचा देव) ब्रह्मा व (तत्वज्ञानी) पातांजली(गोविंद) दत्तस्वरूप होत.

नवयोगीन्द्रवृन्दांश्च व्यासं व्यासात्मजं भजे।आधारपद्मवन लोलन राजहंसी मन्तर्महागगनवासव चापरेखाम्।आनन्द विद्युतमनङ्गरिपोः पुरन्ध्रीमा ब्रह्मविष्णुजननीमभिवादयामि॥

ज्यांच्यापासून ज्ञान (उत्पन्न) मिळेल अशा व्यास व नवयोगीवृंद (नऊ योगी-नवनाथ) ह्यांना भजावे.महाकाशातून येणाऱ्या,राजहंसाप्रमाणे डोलणाऱ्या व अनेक कमळांचा(चक्र) आधार असलेल्या इंद्रधनूप्रमाणे(कुंडलिनीतील रंग)लोभस,मनाला अतिशय आनंदमयी तसेच ब्रह्माविष्णुपासून उत्पन्न होणाऱ्या व विजेच्या वेगाने मनातील दु:ख क्लेश दूर करणाऱ्या त्यांनी मजवर कृपा करावी.

मूलाधारमुखप्रसूनसुलभ ज्वाला समालिङ्गितां बालादित्य सहस्त्रकोटिरुचिमत्तन्तूपमामुन्मनीम्
तत्वातीतसदाशिवेन सततं संयोग वाञ्छापरां तत्वानामुपयाय कान्तिजननीं श्रीकुण्डलीं भावये॥

मूलाधाराच्या मुखातून (चक्रापासून) सहजतेने प्रज्वलित सहस्त्रकोटी ज्वाला एकत्र बांधल्याप्रमाणे उगवत्या सूर्यापासून निघाल्यासारख्या प्रसन्न असून हाच (योग्यांचा) विरक्तांचा आहार आहे.खरे पाहता सदशिवांशी सतत संयोगाच्या इच्छेने ते मोहक तेज प्रकटले असल्याप्रमाणे श्रीकुंडली भासते.

आपार पद्म शिखिहंसविमुक्तनिद्रा मक्षान्त वर्णमणि भूषण दिव्य गाजाम्।
अर्कानिलेन्दु नयनामखिलैक बीजामम्बां भजे परसुधा परिषिक्त मूर्तिः॥

निद्रेतून जागे झाल्यावर रक्तवर्णी (रागावल्याप्रमाणे) दिव्यअलंकाराप्रमाणे ती सर्पिणी (प्राणशक्ति) कमळाच्या पर्वत शिखावरून बंध नसल्याप्रमाणे वाहत आहे जी कळण्यास कठीण असून जी पूजनास योग्य आहे.ही मुख्य,पवित्र व बीजरूप माता आहे परम आनंदाचा वर्षाव करणारी (मूर्ती) होय.हिचे भजन करावे.

सिन्दूर सन्दोह निभां शुभाङ्गीं शिवस्यवामाङ्क विहारलोलाम् ।तेंनैव संलालितमन्दहासां भजामि गौरीं भवतारणाय ॥

बहूतांशी शिवांबरोबर प्रेमाने विहार करणारी सोभाग्यवती,मंदहास्या अशा गौरीची आराधना करावी ज्याने भवसागर तरून जाता येईल.

अष्टाङ्गादि समस्त योगकमल श्रीकुण्डलिन्याःपरःब्रह्मद्वारकवाट पाटन पटोमार्गस्य यल्लक्षणम् ।
तत्वातीत सदाशिवस्य निलयस्यात्म स्वरूपं च य त्तत्सर्वं प्रकटी करोमि च पुरा यागेषु यद्वर्णितम् ॥

कुंडलिनीचा मार्ग हा योगमार्गात सांगितलेल्या (योगमार्गात सर्व अष्ट(मुख्य) कमळे ही कुंडलिनी मार्ग सांगण्यासाठी वापरतात) विशेष मार्गाचे,ब्रह्मव्दाराकडे जाण्याचे प्रवेशद्वार आहे. जो विभागलेला असून त्याची दिशा ब्रह्मव्दाराचा मार्ग दर्शवितो.आत्मस्वरूपाचे(अत्यंत निर्मळ) स्थान हे,आता वर्णन केलेल्या योगमार्गात योग्यप्रकारे सांगितले.

योगशास्त्राणि सर्वाणि सम्यगालोच्य सङग्रहात् । योगसारमहंवक्ष्ये साधकानु जिघृक्षया ॥

योगशास्त्रांनी पुर्णपणे ह्याबदल चर्चा करून निर्देश केला आहे. साधकांच्या जिज्ञासापूर्तीसाठी मी (योगसार)योगाबद्दल सांगत आहे.

गुरूपदिष्टमार्गेण योगशास्त्रानु वर्तिना ।वैराग्यशीलयुक्तानामिदं शास्त्रं प्रगीयते ॥

योगशास्त्राचे मार्गक्रमण गुरूने पथदर्शित केलेल्या दिशेने चालते शास्त्रे वैराग्यशील मार्गाचे गुणगान गातात.

तदुक्तं योगशांकरे - त्याकारणासाठी योगयुक्त (योगाच्या मदतीने)

ज्ञानखडखेगं दृढं कृत्वावैराग्यमय चर्म च । दुर्लभे योगसंग्रामे शूरः कोटौ विराजते ॥

ज्ञानरुपी (तलवारीने) शस्त्राने देह(चर्म)वैराग्य दृढ करून योग मार्गाने क्रमण करणाऱ्या(प्रयत्न-लढाई) कोट्यावधींपैकी थोड्यांनाच किंवा कोट्यावधीपैकी फार कमी लोक योगमार्गाने जातात अशा थोड्याच धारिष्टवंतानाच ते सुख प्राप्त होते.

गीतायाम् - गीतेनुसार

अभ्यासेन च कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥ इति ।योगे नैव विमुच्यन्ते देहिनोभव बन्धनात् ।नान्यथा मुक्तिरेतेषां जन्मकोटि शतैरपि ॥

अभ्यासाने हे अर्जुना वैराग्य प्राप्त करून घेता येते,योगमार्गाने देहबंधनात न राहणे अथवा देहाच्या भावबंधनातून मोकळे(मुक्त) होता येते,नाहीतर हजारो कोटी जन्म झाले तरी त्यास मुक्ती प्राप्त होत नाही.

तदुक्तं योगशांकरे – त्याकारणासाठी योगयुक्त (योगाच्या मदतीने)

नास्ति योगं विनामुक्तिः या मुक्तिर्योगदर्शिता ।योगयुक्तश्चजानाति समुक्तो भवसागरात् ॥ इति ।
निराधे एव चित्तस्य योग इत्यभिधीयते । योगाभ्यास वशेनैव परमात्मा प्रकाशते ॥

योगाशिवाय मुक्ती अथवा मुक्ती योगमार्गच दर्शवितो. या संसारात (भवसागरात) मुक्तांबद्दल योगयुक्त (योगमार्गातील साधकच) जाणतात.योग हा चित्तावर (चित्तदोष-वृत्ती) ताबा मिळवण्याकडे किंवा दोष दुर करण्यासाठी आहे,जे अतिशय कठीण (दुर्लभ) आहे,दोष नाहीसे झाले तरच परमात्मा प्रकाशमान होतो.

तदुक्तं श्वेताश्वतरे - त्यासाठी श्वेताश्वेतानुसार

तावन्मनोनिरोद्धव्यं हृदि यावत् क्षयं गतम् ।एतज्ज्ञानञ्च ध्यानञ्च शेषाश्च ग्रन्थविस्तराः ॥

ज्याप्रमाणात मनाचा निरोध होतो (मनाचा-चित्तवृतींचा लय) त्याप्रमाणात हृदयांत मनाचा (मन हृदयात असल्याने) क्षय होतो,ज्ञानांचा(ज्ञानमार्गी),ध्यान्यांचा(ध्यानमार्गी),व शेषाच्या (शेषाने परमात्म स्वरूप वर्णनाचा प्रयत्न केला तेव्हा तो थकून गेला) ग्रंथाचा उगम व विस्तार (मनाचा लय-चित्तवृत्ति नाहीशा करणे) ह्याचसाठी आहे.

पतञ्जलिश्च योगश्चित्त वृत्तिनिरोध इति ।विध्यन्तःकरणं बुद्धिर्मनस्तद्वृत्तिरुच्यते ॥

तसेच पातांजलीच्या योग म्हणजे चित्तवृत्ति निरोध करून बुद्धि व मनाच्या वृत्ति नाहीशा करण्याचा उपाय हा तसाच होय.

अगमन्मे मनोऽन्यत्रेत्युक्तवात्त्या तद ज्ञातुमर्हसि ॥

त्यानंतर मन अन्यत्र (इकडे तिकडे) जात (भरकटत) नसल्याचे लक्षात (ज्ञात) येते,ही एक हास्य(आनंद)मय (विस्मयकारक) स्थिति असल्याचे समजते.

द्विविधाचित्तवृत्तिः स्या च्छुद्धा शुद्धेति चोच्यते ।अशुद्धा जन्महेतुः स्याच्छुद्धा जन्मविनाशिनी ॥

व्दिधा (व्दैत) अशा चित्तवृत्ति शुद्ध शुद्ध होत असल्याचे संकेत मिळतात,शुद्ध वृत्ती ह्या ज्या अशुद्ध (व्दिधा-व्दैत)वृत्ति जन्मास कारण आहेत त्यांचा नाश करणाऱ्या आहेत.

तदुक्तममृतबिन्दूपनिषदि - त्यासाठी अमृतबिंदू उपनिषदानुसार

मनोहिद्विविधं प्रोक्तं शुद्धञ्चाशुद्धमेव च ।अशुद्धं कामसङ्कल्पं शुद्धं कामविवर्जितम् ॥ मन एव मनुष्याणां कारणंबन्धमोक्षयोः ।बन्धाय विषयासक्तं मुक्तं निर्विषयं गतम् ॥ इति ।

जे मन व्दिधा मनस्थिती दर्शवित असायचे ते अत्यंत शुद्ध (शुद्धाशुद्ध) होते अशुद्ध कामसंकल्प(कर्मसंकल्प-संसारिक कर्म-जन्मास कारण) शुद्ध होऊन मन (निर्विकार) सर्व वासनेपासून मुक्त होते.मनातील संकल्प हेच मनुष्याच्या बंधन(जन्म) व मोक्षास कारणीभूत असतात.विषयासक्त बंधनात अडकतो तर निर्विषयी मुक्तीच्या दिशेने जातो.(मुक्त होतो)

द्वाभ्यामेव निरोधःस्या स्यात् सूर्येन्दुभ्यां यथा तमः ।अन्यथा चित्त चलनं कदाचिन्ननिवार्यते ॥

तदुक्तं पतञ्जलिना- उभयाधीनश्चित्त वृत्तिनिरोध इति ।

तामसी वृत्ती ह्या हानिकारक असून त्यांचा निरोध करून जाळून टाकणे (सूर्य जसा अंध:कार नाहीसा करतो-तामसी वृत्ती अज्ञानाकडे नेतात म्हणून त्या वृत्ति निरोधाने नाहिशा कराव्यात)

पातांजलींनुसार- चित्तवृत्ति निरोध हा दोन्ही कडून उपाय आहे (नवीन उत्पत्ति थांबवणे व आहेत त्या नाहिशा करणे)

व्यासभाष्ये -व्यासांचे मत

अभ्यास वैराग्याभ्यां तन्निरोध इति ॥

वैराग्य,चित्तवृत्ति निरोध (थांबविणे) या संबंधीचा अभ्यास योग होय.

योगसाधनमभ्यासो विरागश्च निरीहता ।द्वाभ्यामेव भवेद्योगो मन्त्रादिर्नैव संशयम् ॥

योगसाधन हे संसारिक गोष्टींमुळे (मन) न ढळण्याचा अभ्यास आहे.जे (वेदशास्त्र जाणणारे) चतुर(अधिकारी) आहेत, त्यांना चित्तवृत्ति दूर सारण्याचे काम (भवेद्द्योग) हे चिंताजनक नाही, ह्यात संशय नाही.

मन्त्रो हठो लयोराजेत्येको योगश्चतुर्विधः ।योगानामर्थ विज्ञानान्मुक्तो भवति नन्यथा ॥

मंत्र हठ लय राज हे चतुर्विध योग आहेत. (चर्तुविध मार्ग योगाचे ज्ञान सांगतात) नाहीतर योगाचा अर्थ विज्ञानाने मुक्त असा झालाच नसता.

प्रत्याहारस्तथा ध्यानं प्राणायामोऽयधारणा ।तर्कश्चैव समाधिश्च षडङ्गोयोग उच्यते ॥

प्रत्याहार तसेच ध्यान प्राणायाम धारणा तर्क तथा समाधी असे सहाप्रकार समजले जातात.

अयञ्च पूर्वपक्षः आदौ योगां गान्यष्टौ निरुप्यपश्चान्मन्त्रादियोगानां स्वरूपन्निरूप्यते ।

सुरवातीला मी (आपण) योगाचा पूर्वपक्ष गायला (सांगितला) तसेच मंत्रादियोगाचे स्वरूप सांगितले आहे.

सूतसंहितायाम् - सूतसंहिता

यमश्च नियमश्चैव तथैवासनमेव च । प्राणायामस्तथा विप्र प्रत्याहारस्तथा परम् ॥

यम नियम तसेच आसन इत्यादि व त्यानंतर साधकांसाठी प्राणायाम,प्रत्याहार अनुषंगाने येतात.

धारणा च तथा ध्यानं समाधिश्चाष्टमो मुने ।अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दयार्जवम् ।

क्षमा धृतिर्मिताहारः शौचञ्चैते यमादश ॥

हे मुनी धारणा ध्यान तसेच समाधी, तसेच अहिंसा सत्य अचौर्य(चोरी,खोटेपणा न करणे) ब्रह्मचर्य दया आर्जव क्षमा भेद (प्रलोभन) सात्विक आहार (योग्य-मिताहार) स्वच्छता (पवित्रता) याप्रकारचे आचार नियम (जेणेकरून मनाची शुद्धता राहून चित्तवृत्ति नाहिशा होतील.)

वेदोक्तेन प्रकारेण विनान्यत्र तपोधन ।कायेन मनसावाचा हिंसाहिंसा न चान्यथा ॥

वेद व वेदांसारखे आणखी संपन्न ग्रंथ ज्याने वैराग्य प्राप्त होईल,कायावाचामने अहिंसक(कोठल्याही प्रकारे हिंसा टाळावी)

आत्मा सर्वगतोऽच्छेद्यो नादह्य इति या मतिः । सा चा हिंसा पराप्रोक्ता मुने वेदान्त वेदिभिः ॥

आत्मा सर्वव्यापी आहे नाद (शब्द) व बुद्धीचा भेद करून अदृश्य होतो. म्हणून वेद,वेदांत ह्यांचे (अहिंसा-हिंसेपासून दूर) मुख्यत्वे असेच म्हणणे आहे.

यत्र दृष्टेन्द्रियैर्दृष्टं श्रुतं वेदविदांवर ।तस्यैवोक्तिर्भवेत् सत्याविप्रसा नान्यथा भवेत् ॥

जिकडे पाहावे (दृष्टि टाकावी) व इंद्रियगोचर पाहावे तिकडे वेदश्रुतिनी सांगितलेल्या सारखे दिसेल तेव्हा त्या जागी तसे प्रमाण मिळाले तरच सत्यता पटेल अन्यथा नाही.

सर्वं सत्यं परं ब्रह्म नामान्यदिति या मतिः । तत्सर्वं परमं प्रोक्तं वेदान्त ज्ञानभाविंतैः ॥

सर्वात ब्रह्म हे अंतिम सत्य आहे नामातीत हे सर्व बुद्धि वा कल्पनातीत (मिथ्या) आहे,वेदांतात सुद्धा हेच ज्ञान सांगितले आहे असे लक्षात येईल.

अन्यदीयेदृणेरत्ने काञ्चने मौक्तिकेऽपिवा । मनसापि निवृत्तिः स्यात्तदस्तेयं विदुर्बुधाः ॥

सोने,रत्ने,मोती (पाण्यात तयार होणारे-शिंपल्यातील) याबद्दल सुप्तावस्थेत असणारी म्हणजेच बुद्धीच्या मुळाशी असणारी (संसारातील) सूक्ष्म इच्छा मन निवृत्त करून घालवावी.

आत्मनो नामभावेन व्यवहार विवर्जनम् । एतदस्तेयमित्युक्तमात्म विद्भिर्महात्मभिः ॥

नामरूप सर्व व्यवहार (नामरूप व्यवहाराची जन्मोजन्मीची सवय) सोडून द्यावी मन दृढ करावे (मनाचे दास न होता) मनाला (मनातील संकल्प भेदावेत) ताब्यात आणावे,हाच त्यातील उपाय आहे.

कायेन मनसा वाचा नारीणां परिवर्जनम् ।ऋतुकालं विनास्वस्यां ब्रह्मचर्यं तदुच्यते ॥

काया वाचा मने नारी (स्त्री) संग(विषय)टाळावा(त्यावर ताबा मिळवावा) त्यासाठी सर्व ऋतुकाळात ब्रह्मचर्य पाळणे,हेच योग्य आहे.

ब्रह्मचर्याश्रम स्थानां यतीनांनैष्ठिकस्य च ।ब्रह्मचर्यं तथैवोक्तं तथैवारण्यवासिनाम् ॥

ब्रह्मचर्य आश्रम स्थानी,वैराग्यशील साधूंसाठी ह्यास महत्व नाही (ब्रह्मचर्य आश्रमात ब्रह्मचर्य पाळतातच) हीच गोष्ट अरण्यात वास करणाऱ्यांसाठी सारखीच आहे.

ऋतावृत्तौ स्वदारेषु संगतिर्या विधानतः । ब्रह्मचर्यं तथैवोक्तं गृहस्थाश्रमवासिनाम् ॥

धर्माने सांगितलेल्या पवित्र (देवाने) मार्गास,गृहस्थाश्रमात अनाहूतपणे(संगतीने)चुकिच्यामार्गाने जाण्याची शक्यता असते म्हणून त्याठिकाणी ब्रह्मचर्याचा (गृहस्थाश्रमातील लोकांना) उपदेश केला आहे.

राज्ञश्चैव गृहस्थस्य ब्रह्मचर्यं प्रकीर्तितम् । विशोवृत्तवतां चैव केचिदिच्छन्ति पण्डिताः ॥

गृहस्थाश्रमात ब्रह्मचर्याची महती सांगावी तसेच त्याबद्दल काही पंडितांनासुद्धा ह्याबद्दल सांगणे आवश्यक आहे.

शुश्रूवैव तु शूद्रस्य ब्रह्मचर्यं प्रकीर्तितम् ।ब्रह्म भावेमनश्चारं ब्रह्मचर्यपरं तथा ॥ इति ॥

तसेच ह्याबद्दल ऐकलेल्या (माहिती असलेल्या) शूद्रांनासुद्धा याची (ब्रह्मचर्य) महती सांगावी.ज्याला ब्रह्मप्राप्ति करून घ्यावयाची आहे (मनात इच्छा आहे) त्यास ब्रह्मचर्य परम आवश्यक आहे.

स्वात्मवत्सर्वभूतेषु कायेनमनसागिरा ।अनुज्ञायादयासैव प्रोक्ता योगांगवेदिभिः ।
मित्रे पुत्रे कलत्रे च रिपौस्वात्मनि सन्ततम् ॥

काया,वाचा तसेच मन व वाणीने आत्मा (स्व- स्वस्वरूप) सर्वत्र (सर्व भूतात) व्याप्त आहे.असे मानावे,योगाभ्यासासाठी व परित्यागासाठी (धार्मिक कार्यासाठी) दया (दयारूप वर्तन) मुख्य आहे.मित्र पुत्र आप्तेष्ट (पत्नी व इतर) ह्यापासून योगमार्गात सततचा धोका(अडथळा)आहे.

एक रूपं मुने यत्तदार्जवं प्रोच्यते बुधैः । कायेन मनसावाचा शत्रुभिः पीडिता च सा ॥

एकरूपता आणण्यासाठी हे मुनीवर,शब्दात(वर्तनात)आर्जव येण्यासाठी कष्ट करण्याची मुख्यत्वे आवश्यकता आहे हे समजून येईल,काया वाचा मने शत्रूलासुद्धा त्रास होईल असे वर्तन करू नये.

बुद्धिक्षोभनिवृत्तिर्या क्षमा सा मुनिपुङ्गव । वेदादेव मुनेर्मोक्षः संसारस्य न चान्यथा ॥

बुद्धिमधील तामसी (अतित्रासदायक,दुसऱ्यास अतिशय त्रास होईल अशा) वृत्ती निवृत्त कराव्या म्हणजे सोम्यकरून (किवा त्यांचे भस्मकरून) क्षमाशीलवृत्तीच्या असाव्यात कारण या वृतीच (तामसी) वेदांनुसार.(असे केले नाहीतर) पुनर्जन्मास करणीभूत होत,नाहीतर हे मुनीवर मोक्षास अडथळा येतो.

इति विज्ञान निष्पत्तिः धृतिः प्रोक्ता च वैदिकैः ।अहमात्मान चान्योऽस्मीत्येवं या प्रस्थिरामतिः ॥

मी,माझेच आत्मस्वरूप सगळीकडे आहे दुसरे काही नाही अशाप्रकरचा बुद्धिचा कल हेच वेदिक धर्मात सांगितले आहे व हिच विज्ञानाची निष्पत्ति (निर्णय) आहे.

सा प्रोक्ता विधृतिश्श्रेष्ठा मुनिभिर्वेदपारगैः वादिभिः ।अल्पमृष्टाशनाभ्यान्तु नास्तियोगः कथञ्चन ॥तस्माद्योगानुगुण्येन भोजनं मितभोजनम् ।

ज्यांनी मीत(अल्प) अन्न खाऊन भूकेवर(जिव्हालोलुप्य) विजय मिळवला आहे त्यांनाच योगमार्गाचा उपदेश करावा इतरांना नाही असे हे मुनीवर वेदाचे गहन शिक्षण घेतलेल्यांना (पाहताच ते वेदांचे अधिकारी आहे असे वाटते) शिकविले आहे,त्याचसाठी (तसेच) उद्योग (संसारात कार्यशील) करणाऱ्यांस मीत भोजन हा गुणासारखा आहे.(ज्याने आळस (सुस्ती) येत नाही)

विश्वेश्वरः –विश्वेश्वरांनुसार

हितं मितञ्चयश्चान्नंयच्चान्नं नैव जीर्यते ॥ धातुः प्रकुप्यते तस्मात् तदन्नं परिवर्जयेत् ।

मीत(अल्प) अन्न भिक्षामागून ग्रहण करावे ज्याने वार्धक्य येणार नाही अशा प्रकारचे अन्न वा इतर त्याचसारखे अन्न शरीरात शोषल्यावार उत्साह कमी होईल (आळस व वार्धक्य) ते वर्ज्य करावे (टाळावेत)

योगसारमञ्जर्याम् -योगसारानुसार(योगसारांश)

आहाराच्छिद्यते योगी कृष्णपक्षे तु चन्द्रमाः। शुक्लपक्षे यथा चन्द्रोमिताहारः प्रवर्तते॥

आहार हा चंद्रकलांप्रमाणे आहे कृष्णपक्षाप्रमाणे योगातील प्रगतीस अंधाराकडे नेणारा आहे,तर मीत(आवश्यक तेवढाच)आहार शुक्लपक्षाप्रमाणे(प्रगतीकडे नेणारा)आहे. ज्याप्रमाणे कृष्णपक्षात चंद्रमा दिसत नाही व शुक्लपक्षात दिसतो.म्हणून योग्य मार्गाने जावे.

गीतायाम् - गीतेप्रमाणे

नात्यश्नत्श्च?योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः॥ इति।

मनाच्या विकृती (चित्तवृत्ति,वासना) पुढे योग्याने दबून (वाकू) जाऊ नये त्यावर ताबा मिळवावा.

सूतसंहितायाम् - सुतसंहितेनुसार

स्वदेह मलनिर्मोक्षं मृज्जलाभ्यां महामनु। युक्तशौचं भवेद्बाह्यं मानसं मननं विदुः॥

स्वत:च्या देहाचा मल (शौच) (शरीर व मनाचा) बाहेर टाकावा व त्याचे (स्वच्छता)शुद्धीकरण करावे,अपान द्वार शुद्ध करावे.(अपानाचे शुद्धिकरण)

अहंशुद्ध इति ज्ञानं शौचं वाञ्छन्तिपण्डिताः। ज्ञान शौचं परित्यज्य बाह्ययोरमते नरः॥

पंडितांनी मी शुद्ध आहे (असा अहंभाव) व वाणी शुद्ध(आर्जव,गोड) करावी तसेच बाह्यज्ञान (विषयज्ञान) ज्यात मन रममाण होते ते वर्ज्य (टाळावे) करावे.

समूढः काञ्चनं त्यक्त्वा लोहं गृह्णाति सुव्रत। ज्ञानाम्भसैव शुद्धस्य कृतकृत्यस्य योगिनः॥

ज्याप्रमाणे सोने व लोहे घराच्या सौख्यासाठी जमवितात तसेच ज्ञान मिळवून योगीजन(मन शुद्ध करून) शुद्ध होउन कृतकृत्य होतात.

कर्तव्यं नास्तिलोकेऽस्मिन्नस्ति चेन्न सतत्त्ववित्। अथ नियमः।

जोपर्यंत (बाह्यविषय) कोठल्याही वासनांचा प्रवेश होत नाही,तोपर्यंत योग्यांना कर्तव्य कार्य (कर्म) नसते,असा नियम आहे.

याज्ञवल्क्यः -याज्ञवल्क

तपस्सन्तोषमास्तिक्यं दानमीश्वरपूजनम्। सिद्धान्त श्रवणं चैव ह्रीमतिश्च जपा व्रतम्॥

मनाला (मेंदूला,बुद्धिला) संतोष हा तपाने होतो,दान ईश्वराप्रमाणे पूज्य मानावे,(योगातील) सिद्धांत (श्रवण) ऐकावेत,व जप करण्याचे व्रत करीत असल्यास उत्तम(भाग्य) आहे,ज्याने अचानक निर्माण होणारा असंतोष (मनाचा अस्थिरपणा) शांत होतो.

एते च नियमाः प्रोक्ताः योगविद्भिर्महात्मभिः। ता नहं क्रमशो वक्ष्ये शृणु श्रद्धापुरस्सरम्॥

योग्यांसाठी हाच उपाय महात्म्यांनी सांगितल्याचे शिकले आहे. त्याचप्रमाणे मी नक्की (छातीठोकपणे)श्रद्धापूर्वक सांगतो कि पूर्वी मी असा नियम ऐकलेला नाही.

वेदोक्तेन प्रकारेण कृच्छ्रचान्द्रायणादिभिः। शरीरशोषणं यत्तत् तप इत्युच्यते बुधैः॥

वेदांच्यामाध्यमातून पुनःपुन्हा चंद्रकलेप्रमाणे ज्याच्यापासून क्लेश होतात ते दूर करावेत अर्थात जे नाही ते दिसते त्याचा निरास करावा. (क्लेशाचे) मूळकारण (देह) त्याचे तपाव्दारे (शरीराचे) शोषण करणे हा उत्तम उपाय आहे.

यदृच्छा लाभतोनित्यमलं पुंसां भवेदिह । या वीस्तामृषयः प्राहुस्सन्तोषस्य च लक्षणम् ॥

असे करण्याने चित्तात,संसारात वावरताना साठलेला मल जलद (क्षणार्धात,ताबडतोब) निघून जाण्यास सुरवात होते. ज्या चुकीच्या धारणा पूर्वी सोन्यासारख्या होत्या त्याची आहुती दिली जाते.आणि त्या कल्पनांच्या बंधनातून मुक्त झाल्यामुळे ते आनंदाचे (संतोष-तृप्तीचे) कारण बनते.

धर्माधर्मेषु विश्वासो यस्तदास्तिक्यमुच्यते । न्यायार्जित धनं चान्नं शुद्धया वैदिके द्विजे ॥ अन्यद्वायत् प्रदीयन्ते तद्दानं प्रोच्यते मया ॥

धर्माधर्माच्यावर (धर्म-अधर्म यावर) विश्वास ठेवणारे दानावरसुद्धा खूप विश्वास ठेवतात,न्यायसंगत (म्हणून शुद्ध) धन (संपत्ती) दिल्याने वैदिक (ब्राह्मण) यांस हानी होत नाही,कारण ते दान शुद्ध होय,मी असे सांगितले आहे कि दुसऱ्या अन्य गोष्टीसुद्धा अर्पण करा.

वैदिकाय च विप्राय यद्दत्तं वस्तु शोभते । नोपकारायदत्तं स्याद्धस्मनीव हुतंहविः ॥

वैदिक व साधू संन्यासी यांच्या जवळची कोठलीही वस्तू शोभायमान होते,ज्या गोष्टीचे हवन केले आहे त्याच्यासाह्याने गती मिळून अनेक संकटे आपल्यापासून दूर राहतात,हवन हे (ज्याला हवन करावयाचे त्याच्या) उपकारासाठी नाही(स्वतःसाठी आहे).हवन पुढे नमूद केलेल्यांसाठी साधारणपणे करतात.

आदित्यमम्बिकां विष्णुं गणनाथं महेश्वरम् । यथा शक्त्यर्चनं भक्त्या यत्तदीश्वर पूजनम् ॥ इति ।

सूर्य,अंबिका(दुर्गा) विष्णु गणेश तथा महेश्वर तसेच शक्ती व ईश्वर यांची उपासना पूजन व भक्ती व इतर हे हवनासाठी साधारणपणे मुख्य देव आहेत.

सूतसंहितायाम् - सुतसंहितेप्रमाणे

रागाद्यपेतं हृदयं वागदृष्टानृतादिना । हिंसादिरहितः कायः एतच्चेश्वरपूजनम् ॥

मुख्यत्वे राग (क्रोध) व त्यानुसार हृदयातून येणारे शब्द असतात, हिंसारहित काया व मन म्हणजेच ईश्वर पूजा होय.

सत्यं ज्ञानमनन्तञ्च परानन्दं परं ध्रुवम् । प्रत्यगित्यवगन्तव्यं वेदान्त श्रवणं बुधैः ॥

सत्य हे ज्ञान व मन ह्यापेक्षा चिरकाल परमानंद देणारे आहे.वेदांत श्रवणाने सत्य समजणे म्हणजे जुन्या ज्ञान व मनाच्या संकल्पना जाऊन नित्य नवीन्याकडे (सत्याकडे) नेणाऱ्या संकल्पना तयार करणे होय.

सिद्धान्त श्रवणं प्रोक्तं पुराणश्रवणं बुधैः । वेदवैदिकमार्गेषु कुत्सितं कर्म यद्भवेत् ॥

पुराणश्रवण केल्याने जे समजते ते सिद्धांत श्रवण केल्याने समजल्याचे निर्देशित करते.वेदाध्यायन व वैदिक धर्म आचरण या मार्गाने वाईट कर्माचा त्याग केला जातो.

तस्मिन् भवति या लज्जा हीश्च सैवेति कीर्तिता। वैदिकेषु च सर्वेषु श्रद्धयामतिर्भवेत्। गुरुणा चोपदिष्टोऽपि तत्र संबंध वर्जितः॥

वाईट कर्म जे लज्जेला कारणीभूत होते त्याचा त्याग केल्याने कीर्ति प्राप्त होते वैदिक असो कि इतर सर्वांना मन व बुद्धी यात श्रद्धा असणे आवश्यक आहे,गुरूच्या उपदेशानुसार(दृष्टीने) चालावे व ते संबंध (कर्म) वर्ज्य करावेत.

वेदोक्ते नैव मार्गेण मन्त्राभ्यासो जपः स्मृ ः। कल्पसूत्रे तथा वेदशास्त्र पुराणके। इतिहासे प्रवृत्तिर्या सा जपः प्रोच्यते मया॥

वेदशास्त्र व इतर मार्गांनी मंत्रांचा अभ्यास करावा,कल्पसुत्रे वेदशास्त्र व पुराणे तसेच इतिहास मनाच्या अनेक प्रवृत्ति (वृत्ति) याबद्दलचा अभ्यास(जप-पाठांतर) या बद्दल मी सांगितले.

या वेद बाह्यास्मृ यो याश्चकाश्च कुदृष्टयः। सर्वास्ता निष्फलाः प्रोक्तास्तमोनिष्ठा हितास्स्मृताः॥

वेदांच्या बाहेरचे लक्षात ठेवलेले वा मिळवलेले ज्ञान हे याचकासाठी योग्य नसते.ज्याप्रमाणे मूल झाल्यानंतर (पाळी येऊन गेल्यावर) स्त्री असते त्याप्रमाणे याचकांची श्रद्धा (विश्वास) विचलित वेदबाह्य ज्ञानाने होते.तरी याचकाने स्मृतीतल्या त्या ज्ञानावर निष्ठा ठेऊ नये.

गीतासु -गीतेनुसार

श्रेयान् स्वधर्मोविगुणः परधमात्स्वनुष्टितात्। स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥ इति।

स्वधर्म हा जरी उणा वाटत असला तरी त्याचेच आचरण करावे परधर्म कितीही चांगला वाटला तरी त्या मार्गाने जाऊ नये,इतकेच काय स्वधर्म पाळताना निधन झाले तरी श्रेयस्कर आहे,कधीही परधर्म हा घातक (भयावह) आहे.

तस्मात् सर्वं प्रयत्नेन वेदमन्तं सदा जपेत्। जकारो जन्मनाशः स्यात् पकारात्पापनाशनम्। जन्मपापविनाशित्वाज्जप त्युच्यते बुधैः॥

सर्वप्रकारे वेदांच्या मतानुसार चालण्याचा (जपायचा) प्रयत्न करावा,पुर्नजन्माच्या कारणांचा वेगाने नाश करण्यासाठी पापांचा नाश (जन्मास कारणीभूत) करणे आवश्यक आहे,जपजाप्य हा यातील उत्तम उपाय आहे.

जपश्च त्रिविधः प्रोक्तः वाचिकोपांशु मानसः। मानसो मनसाप्रोक्तो ह्युपांशुर्जिह्वया स्मृ ः॥

जप अनेक प्रकारचे आहेत पण जे लक्षात राहतील व ज्याने मनाला आवर घातला जाऊन गुंतलेले मन मोकळे होईल असा जप असावा.

उच्चैर्जपो वाचिकः स्यात् इति वेदविदांवरः। मानसं तु सहस्त्रं स्यादुपांशुश्शतमुच्यते॥

वाचिकस्त्वेक एकः स्यात् जप लक्षणमीरितम्।

उच्चाराने करण्याचा वा वाचकाचा जप हा,तसेच कदाचित वेदिक धर्मातील जप उच्च स्वरात करतात,पवित्र जप जे बुद्धिचे वा धार्मिक आहेत ते हजारो असून सर्वबंधनापासून मुक्ती देणारे आहेत परंतु ह्या जपांच्या सागरात वाचकाचा जप हा एकच-एक(विशेष)असून लक्षणीय कार्य करतो.

विश्वामित्रः –विश्वामित्रानुसार

यदुच्चनी च स्वरितैः शब्दैः स्पष्टं पदाक्षरैः ॥ मन्त्रमुच्चारयेद्विप्रो जपयज्ञस्सवाचिकः ॥ स्वरवर्णपदैर्वाक्यं शुद्धमावर्तयेज्जपन्।

शब्द,पदे,अक्षरे ह्याचा उच्चार म्हणताना स्पष्ट करावा तसेच स्वर वर्ण पदे वाक्य यांचा जप शुद्ध असावा, मंत्रांचा उच्चार अर्थरूप असावा कारण त्याचा संबंध यज्ञाशी आहे आणि त्यातून दोन अर्थ निघू शकतात.

न कम्पयेच्छिरो ग्रीवां दन्तान्नैव प्रपीडयेत्। नीचैश्श्रुतो भवेद्भार्गीण्यश्रुतं सफलं भवेत्॥

आज्ञान्यांचे अत्यंत भितीने दांत वाजतात व त्यांना कंठशोष अशी पिडा होते, त्यासाठी हिनांना उपदेश केल्याने (शिकवल्याने) हृदय द्रावक पिडा कमी होण्यास यश मिळते.

ऋषिश्छन्दो देवताश्च ध्यायन् मन्त्रं च सर्वदा ।यस्तु मन्त्रं जपेद्भार्गी तदेव हि फल प्रदम्॥

ऋषिंच्या छंदात नेहमी देवतांचे ध्यान मंत्र असतात तरी मंत्र जपानंतरच हृदयपिडा नाहिशी झाल्याचे फळ मिळते.

प्रसन्न गुरूणापूर्वमुपदिष्टत्त्वनुज्ञया। धर्मार्थ कामसिद्ध्यर्थं यत्तु तद्वत मुच्यते॥ इति।

गुरूला प्रसन्न करून आपल्या उद्दीष्टासाठी प्रथम अनुज्ञा (संमती) मिळवावी धर्मातील कार्य सिद्ध करण्यासाठी हे करणे उचित व उत्तम होय.

॥अथासन क्रमः – आता आसनक्रम ॥

अथासन क्रमं वक्ष्ये साधकानां हिताय वै। यदभ्यास क्रमेणैव स्थिरत्वं सुकरं भवेत्॥

आता मी साधकांच्या हितासाठी आसन क्रम सांगतो त्यानुसार अभ्यास करून सहजपणे स्थिरता प्राप्त करून घेता येईल.

योगसारमञ्जर्याम् - योगासार

वीरं कूमर्च्च सुदृढं स्वस्तिकं कुक्कुटासनम्। मयूरं विजयं चैव पद्मं व्यासासनं तथा॥

वीर,कूर्म ही सुदृढ तसे स्वस्तिक व कुक्कुटासन, मयूर विजयासाठी व पद्म हे व्यासासन होय.

दृढासनं च वृषभं गारूडं गजमेव च ।सिद्धं सिंहासनं चैव प्रवक्ष्यामि यथा विधि॥

दृढासन वृषभ गरुड गजासन सिद्धासन सिंहासन इति यथाविधी मी सांगितले.

समाधाय शुचौ देशे हृद्य वस्त्रोत्तरच्छदे। जङ्घां च दक्षिणां न्यस्य सम्यग्वामो रूमूर्धनि॥

जी वस्त्रे परिधान केली आहेत व ज्या देशात आपण आहोत तेथील चिंता समाधान व जडत्व (दक्षिणासनात बसल्यावर) यासाठी मुर्धा (उच्च) ध्यान (मुर्धा- डोके-काल्पनिक आकाश) करावे.

समग्रीवशिरो वक्षोहस्तौ विन्यस्य चोपरि ।आकुञ्च्य गुदमेकाग्रो वीरासनमिदं परम्॥

समस्त डोके,शिर,छाती,हस्त,नाकाच्या रेषेत (सरळ) ठेऊन न हलता गुद-द्वाराचे आकुंचन करून (अपानवायू रोखून) वीरासन सिद्ध करावे.

अनेनाभ्यासयोगेन यागोरूढः प्रसिद्धयति। न चाभ्यासविधौ चैतश्शष्यते शीघ्रसिद्धये॥

अनेक प्रकारचा योगाभ्यास करून योगारुढ होणे हे प्रसिद्ध आहे,योगाभ्यासाशिवाय मनाला शीघ्र स्थिरता येत नाही व आपण योगारूढ होत नाही.

तस्यैव दक्षिणे जंघां न्यसेद्वामोरु मूर्धनि। कूर्मासनं तु विज्ञेयं सर्वेन्द्रिय वशंकरम्॥

त्याचप्रमाणे दक्षिणासनात(उजवा पाय) मेरुदंड व मुर्धा (शिर-कल्पनारुपी आकाश) यात मन केद्रित करावे,कुर्मासनात सर्व इंद्रिय वश करावीत.

दक्षपादं च वामोरुमूले विन्यस्यतत्पदम्।दक्षोरु मूलपीठार्थं कल्पयेत् सुदृढासनम्॥

डावा पाय हा मुलावर (शिवण-गुद व लिंग यामधील) ठेऊन आसन करावे,उजवा पाय ठेवल्यावर शरीर स्थिर करावे म्हणजेच सुधृढासनाची (आसन नीट असल्याची) कल्पना(खात्री) करावी.

बाहुयुग्मं समुत्सृज्य स्वस्तिकासनमीरितम्। सर्वसिद्धिप्रदं देवि सर्वरोगविनाशनम्॥

दोन्ही बाहूंच्या योगाने स्वस्तिकासन करावे हे देवी (हे आसन) सर्व सिद्धी व सर्व रोग यांचा नाश करणारे आहे.

वामगुल्फमधः कृत्वा कृत्वोपरि च दक्षिणम्। गुदे ना पीडयवैजान्वोः युगलं परिपात्य च॥

डावा घोटा मध्ये आणून उजवीकडे वळवावा व गुदाजवळ योग्यप्रकारे फार पिडादायक वा सैल ठेऊ नये तसेच दोन्ही गुडघे समान ठेवावेत.

वामहस्तागुंली मूलेष्वत्वाष्टभ्य यथा तलम्।दक्षहस्तांगुलीमूले परिवर्त्य च तत्तले॥

डाव्या हाताचे बोट तळव्याकडे वळवावे (अंगठ्या जवळील) व इतर तीन सरळ (मुळापासून) ठेवावीत तसेच दुसऱ्या हाताचे ही करावे.(न्यास करावा)

ऊरुमूलद्वयं पीडयघ्राणाघ्रे स्थापयेद्दृशौ। कुक्कुटासनमेतद्वै मनसः स्थैर्यकारणम्।

ऊरुमूल द्वयेस्थाप्य पाद युग्मं निधाय च॥

शिवणीजवळ(गुद व लिंग यामधील जेथून मेंदूकडे जाणाऱ्या वाहिनींची जोडी आहे त्याच्या मुळाशी) आसनात बसल्यावर हलका दाब देऊन बसावे व मग दृश्याकडे (ध्यानाकडे) जावे.कुक्कुटासनात बसल्यावर मनास स्थैर्य लाभते.पावलांची जोडी शिवणीच्या जवळ असावी.

तयोर्मध्ये स्थिर गुदः पृष्टमुन्नम्य निश्चलः। तथा करतलद्वन्द्वं समासीनः परस्परम्।

ऊर्वोरु परिविन्यस्य नासिकामवलोकयेत्।

आसनामध्ये असताना मांडी व ढूंगण (गुदपृष्ठ) व डोके स्थिर ठेवावे (स्थिर- हलू नये) तसेच कराचे तळवे (हात) स्थिर (मांडीवर) व समान असावेत.

मयूरासनमतेद्वै सर्वव्याधिविनाशनम्।एतस्य बाहु युगलं कारयेद्दण्ड युग्मवत्॥

मयुरासनात सर्व व्याधींचा नाश होतो. तसेच बाहुंची जोडी दंडाच्या (काठीच्याप्रमाणे) जोडीप्रमाणे असावी.

करद्वय तलं भूमौ पुटाकारेणधारयेत्।किञ्चिदानम्रित तनुः निश्चलास्थिरमानसः॥

दोन्ही करांचे तळवे भूमीला पकडल्यासारखे धरावेत.शरीर थोडेसे झुकवून मन स्थिर व निश्चल करावे

पादौ निलोकयेद्रम्यं समासीनः समाहितः। व्यासासनमिदं सद्यो व्याधिघ्नं योगसिद्धिदम्॥

प्रत्येक पाद (पाय) अशातऱ्हेने ठेवावा कि तो हलणार नाही जणू काही जोडले आहेत व सारखे आहेत.व्यासासनाचा(पद्मासन) अभ्यास अशातऱ्हेने वाढवावा कि आपला हेतू लवकर साध्य होईल व आपण व्याधीमुक्त (आसन घालण्यात सहजता) होऊन योगाभ्यासासाठी सिद्ध होऊ.

वामपादमथोत्तानं कृत्वादक्षोरुमण्डले। दक्षपादं च वामोरौ तथा भूतं निधापयेत्।

ऊरुभ्यामुपरिस्थाप्य बाहुं त्यज्य यथा यतः। कर पृष्ठं च दक्षाख्यं व्यसेद्वामतलान्तरे॥

डावा पाय पद्मासन घालण्यासाठी उचलल्यावर सर्व शरीर उजवीकडे झुकते ते स्थिर करून उजवा पाय उचलता आला व त्यानंतर पद्मासन घातले तर अतिशय सुंदर स्त्रीचे पाय असल्यासारखे दिसते.दोलायमान अशी देहाची स्थिति घालवण्यासाठी हात छाती समोर ठेऊन कराचे तळवे समोर व जमिनीकडे असावेत.

ऋजुग्रीव शिरोभूत्वा नासिकामवलोकयेत्। न निमीलन्नचोन्मीलन् कुर्यादाकुंच्य वै गुदम्॥

मानेवर शिराचा (डोक्याचा) ताण न येईल अशा तऱ्हेने नाकावर दृष्टि स्थिर करावी,डोळ्यांवर झापड येऊन शरीर पृष्ठभागाकडून वाकून (गुदाकडून),चुकीचे होऊ नये असे करावे.

समदेह स्थिरमतिः पद्मासनमिदं परम्। सर्वयोग प्रसिद्ध्यर्थमभ्यसेद्भवभित्तये॥

देहाची स्थिर स्थिति व स्थिर झालेली बुद्धी (नासिकेवर ध्यान करून) अशातऱ्हेचे पद्मासन सिद्ध करावे (त्यासाठी अभ्यास करावा) सर्वयोगात जे प्रसिद्ध व उत्तम आहे ते साधण्याचा प्रयत्न करावा.

वमजङ्घोपरिस्थाप्य दक्षजंघांजितेन्द्रियः। दक्ष जंघोदरेमूले गुल्फपार्श्वेन्निधापयेत्॥

जितेंद्रिय (संन्यासी) योगीयाने डाव्यापायाचा घोटा उजव्या जांघेच्या मुळाशी (शिवणीजवळ) स्थापित करावा.

हस्तादिमति पर्यन्तं पद्मासनवदाचरेत्। विजयासनमेतद्धि सर्वसिद्धिकरं परम्॥

हातापासून बुद्धिपर्यंत पद्मासनाचे आचरण करावे,तसेच सर्वसिद्धी प्राप्तिसाठी विजयासन हा पर्याय आहे.

ऊरुभ्यामुपरिस्थाप्य पादयुग्मं प्रयत्नतः। दक्षिणं सव्यदेशे च सव्यं दक्षिण देशके॥

मांडीवर प्रयत्न करून दोन्ही पाय स्थापन करावेत.ते अशा तऱ्हेने ठेवावेत कि ते उलट दिशांकडे असतील (डावा तळवा उजवीकडे व उजवा तळवा डावीकडे)

करद्वयं पृष्ठदेशे परिवर्त्य प्रयत्नतः। पादांगुष्ठ द्वयंसम्यकखे कराभ्यांसंनिगृह्य च॥

प्रयत्न करून हाताचा वरचा भाग असा ठेवावा कि त्यांची दिशा बदलता येईल.

किञ्चिदुत्तान हृदयो नासिकामवलोकयेत्। दृढासनमिदं प्रोक्तं सद्योरोगविनाशनम्॥

किंचित खोल अशा हृदयाकडे दृष्टी वळवल्यावर नाकाचा भाग दिसेल,सर्वरोगव्याधी विनाशासाठी दृढासन योग्य ठरेल.

वाम गुल्फक पृष्ठे तु दक्षगुल्फं निधापयेत्। पातयित्वा महेशानि जानु युग्मं महीतले॥

डाव्या पायाचा घोटा त्याच्या पृष्ठभागावर स्थापित केल्यावर भू-मातेवर(दोन्ही पायांचे घोटे) घट्ट करावेत.

ऊर्वोः कूर्परमाधारं कृताञ्जलि पुटौ करौ। कुञ्चचिबुकसंयोगं नासिकाग्रंविलोकयेत्॥

कोपराला छातीचा आधार देऊन नम्रतापूर्वक अशी मुद्रा केल्याने व छातीला चुंबकासारखे कोपरे चिकटवल्याने नासिकाग्र पाहता येते.

गरुडासन मेतद्वै सर्वसिद्धिकरं परम्। गुदेन पीड्यधरणीं पादाभ्यामपि संस्फुटम्॥

गरुडासन हे दोन्हीपेक्षा सर्वसिद्धी देणारे आहे.गुदाजवळ पाय ठेवणे व जमिनीवर खिळून ठेवणे हे तसे जिकरीचे व त्रासदायक होऊ शकते.

जान्वोरूर्ध्वकरौ स्थाप्य स्थिरदेहो भवेद्दृढम्। एतद्वजासनं सर्वविघ्न विच्छेदकारकम्॥

गुडघे वाकवून (पाय गुडघ्यात वाकवून बसले)त्यावर हात ठेवले तर शरीर स्थिर राहून दृढ असे आसन करता येते अशा प्रकारे केलेले वज्रासन हे सर्व विघ्नांचा नाश करणारे आहे.

ऊरूयुङखेमूलपीठार्थं जंघे चा श्लिष्यपार्वति। पादयुक् पश्चिमं न्यस्य पर्यङ्कोनदृढं तनुम्॥

दोन्ही पायांच्या मध्ये मूळपिठ (मूलाधार चक्र) आहे ज्यात पार्वती(कुंडलिनी) घट्ट वेटोळे घालून बसली आहे.जेव्हा पाउल उलट दिशेला ठेवले असेल (पुर्वीकडे तोंड असता पश्चिमेकडे) तेव्हा आसन दृढ होते (शरीर स्थिर राहते)

गल्फेन गुदमा पीड्य सव्यं गुह्योपरिक्षिपेत्। समदेहः स्थिरोभूत्वा शुद्धासनमिदं परम्॥

घोटे जेव्हा गुदाखाली(शिवणी जवळ) त्याच्या दिशेनेच दाबून ठेवतात तेव्हा तो तेथील(आजुबाजूची) सर्व जागा व्यापतो व देह स्थिर व समान राहून शुद्धासन सिद्ध होते.

सर्वसिद्धि प्रदं देवी सर्वव्याधिविनाशनम्। जंघाभ्यामूरु युगुमं च समाश्लिष्यनिपात्य च॥

हे देवी,हे सर्व सिद्धी देणारे व सर्व व्याधींचा विनाश करणारे आहे.पायांची जोडी (घोटे) ही जांघेच्या मुळाशी (शिवणीजवळ) जोडून योग्यप्रकारे आसन घालावे.

कूर्परौ स्तम्भवत् कृत्वा पार्श्वेनैकेन संश्रयेत्। एतत् प्रोक्तं मया देवि वृषभासन मुत्तमम्॥

सर्वरोगविधातार्थे प्रोक्तमेतन्महात्मभिः॥ इति।

कोपरे(व घोटे) पार्श्वभागावर (पाठीमागे) एखाद्या स्तंभासारखे (काठी) ठेवावेत,हे देवी याप्रमाणे उत्तम असे वृषभासान कसे करावे हे मी सांगितले.

आदिनाथेन निर्णीत मासनं वक्ष्यतेऽधुना। तत्कुर्यादासनं स्थैर्य मारोग्यं चांगपादवम्॥

आदिनाथांच्या निर्णयानुसार लोखंडी भात्यातून जसा स्वर निघेल तशा स्वराने आरोही छातीतून काढल्यास स्थैर्य व आरोग्य प्राप्त होण्यास सुरवात होते ज्याचा परिणाम दात व पाय ह्यावर व शरीरावर पडतो.

जानूर्वोरन्तरे सम्यकखे कृत्वा पादतले उभे। ऋजुकायः समासीनः स्वस्तिकं परिचक्षते॥

स्वस्तिकाकडे सरळपणे (थेट) जाण्यासाठी गुढघ्यात वाकून व पाय समान जोडून तळव्यावर उभे राहिल्यास स्वस्तिकासन सहज दृष्टिक्षेपात येते.

सव्ये दक्षिणगुल्फं तु पृष्ठ पार्श्वे निवेशयेत्। दक्षिणेऽपि तथा सव्य गोमुखं गोमखुं यथा॥

उजवा घोटा डावीकडे पाठीमागे (गुदाच्यामागे) ठेवून उजवीकडे गोमुखासन करता येते.

गुदं निष्पीड्य गुल्फाभ्यां व्युत्क्रमेणसमाहितः। कूर्मासनं भवेदेतदिति वेदविदां मतम्।
पद्मासनं सुसंस्थाप्य जानूर्वोरन्तरे करौ॥

गुदाच्या शिवणीजवळ पिडा न देणारे,अशा कूर्मासनाच्या मार्गाने गेल्यास राजाप्रमाणे कार्य होते असे वेदविद्या जाणण्याऱ्यांचे मत आहे.पदामासन स्थापण्यासाठी कर (हात) वळवून-झुकवून (गुडघ्यावर) ठेवावेत.

निवेश्य भूमौ संस्थाप्य व्योमस्थं कुक्कुटासनम्। कुक्कटासन बंधस्थोदोर्भ्यां संगृह्य कधंरम्॥

कुक्कुटासन हे आकाशात (अधांतरी) असते, ते स्थापन करण्यासाठी (हात जमिनीवर ठेऊन शरीर मांडी घालून उचलतात- जसा कोंबडा असतो) भोवऱ्यासारखे असते (हात-भोवऱ्याचा अक्ष) गळ्याच्या भागाला यात फारसे महत्व न देता कुक्कुटासन करावे.

शेते कूर्मवदुत्तानंमेतदुत्तान कूर्मकम्। पादांगुष्ठौ तु पाणिभ्यां गृहीत्वाश्रवणावधि॥

कूर्मासन हे कठीण आहे असे साधारण मत आहे त्यासाठी जमिनीवर प्रथम झोपून व श्रवणावर ताबा मिळवून पायाचे अंगठे हाताने धरावेत.

धनुराकर्षका कृष्टन्धनुरासनमीरितम्।वामोरुमूलार्पित दक्षपादं जान्वोर्बहिर्वेष्टित वामदोष्णान्।
प्रगृह्य तिष्ठन् परिवर्तितां गोमत्स्येन्द्र नाथोदितमासनं न्यसेत्॥

मागे पुढे हलणारे असे धनुरासन (एखाद्या लाटेप्रमाणे-आवाज करून पुढे-मागे होते),अभ्यासाने घोटीव झालेले शरीर व मांड्या यांच्या साह्याने मानेला बाहेरून अच्छादल्याप्रमाणे ठेऊन मूलाधारावर लक्ष ठेऊन संपन्न करावे.

मत्स्येन्द्र पीठं जठर प्रवृद्धं पचण्डरुङखेमण्डल खण्डनास्त्रम्।अभ्यासतः कुण्डलिनी प्रबोधं शुद्धस्वरूपं च ददाति पुंसाम्॥

जठरस्थित मत्स्येन्द्रापिठ येथे शक्ति प्रविष्ट झाल्यावर तेथील उर्जा वाढून ते शक्तिशाली होते व निश्चितपणे शरीराचा भेद शस्त्राने(शस्त्रांचा भेद होतो) होत नाही.अभ्यासाने कुंडलिनी जागृत होऊन ती शुद्धस्वरूप धारण करण्याकडे प्रवास करते आहे असे जाणवते, ती जागृतीकडे जात असल्याचे अनेक संकेत मिळतात.

प्रसार्य पादौ भुवि दण्डरूपौ दोर्भ्यां पदाग्रद्वितयं गृहीत्वा। जानू परिन्यस्त ललाट देशो भवेदिदं पश्चिमताणमाहुः॥

भूमिवर पाय खांबांप्रमाणे लांब करून पसरावे (बसावे) पाय सरळ व ताठ ठेवावे कपाळ घोट्यावर ठेवावे यालाच पश्चिमोस्तान म्हणतात.

यदि पश्चिमताणमासनाग्रयं पवनं पश्चिमवाहनं करोति। उदरे जठरानलो ज्वलस्स्यात् उदरे कार्श्यमरोगता च पुंसाम्॥

जर पश्चिमोत्तासनात असताना पश्चिमेकडून(गुदातून) वायू (घाण) वाहू लागेली तर पोटात जलोदर (रोग) असू शकेल व शरीर कृश होईल.

धरामवष्टभ्यकरस्थलाभ्यां तत्कूर्परस्थापित नाभिपार्श्वम्। उच्चासनोदण्ड वदुत्थितः खे मयूरमेतत् प्रवदन्ति पीठम्॥

नाभीजवळ कर ठेवून तेथे घोटे प्रस्थपित केले व दंड उच्च (ताठ) असतील तर तेथे अग्नि असून (नाभी जवळ) मयूर पीठ आहे असे म्हंटले जाते.

उत्तानशववद्भूमौ शयानन्तं शवासनम्। सर्वासनश्रान्तिहरं चित्तविश्रान्ति साधनम्॥

शरीर जर जमिनीवर शवा(मृत शरीर)सारखे पसरले (पहुडले-झोपले) तर शवासन हे सर्वासन असून शांती विश्रांतीचे साधन आहे.

मुख्यं सर्वासनेष्वेवं सिद्धासिद्धासनं विदुः। ऊरुयुङखेमूलपीठार्थं जंघे चाकुंच्य पार्वति।
पादयुकखे पश्चिमे न्यस्य पर्यङ्के सदृढन्तनुम्॥

मुख्य सर्वासन सगळ्यांसाठी सिद्धांसाठी सिद्धासन असे म्हणतात घोटे शिवणीजवळ (मूळ-पिठात) दाबले असता पार्वतीस्थानात असतात,पाय उलट दिशेला असताना (वज्रासन) शरीर सुदृढ होते.

गल्फेन गुदमापीड्य सव्य गुह्यो परिक्षिपेत्॥समदेह स्थिरो भूत्वा सिद्धासनमिदं परम्।
सर्वसिद्धिप्रदं देवि सर्वव्याधि विनाशनम्॥

घोटे शिवणीजवळ ठेऊन दाब दिला जातो व देह समतोल करून भूमिवर स्थिर झाल्यावर सिद्धासन योग्य होते.

चतुराशीतपीठेषु सिद्धमेवसमभ्यसेत्। द्विसप्ततिसहस्त्रेषु सुषुम्नामिवनाडिषु॥

चार राशी पिठात(मूलाधारात-चार पाकळ्या) पूजनीय व स्वयंसिद्ध पूर्णपणे स्थित आहेत (मूलाधारात सुषुन्मा नाडी आहे) ज्यातील शक्ति सात चक्रातून सहस्राकडे (मेंदू) प्रवास करते व तिचा मार्ग सुषुन्मा नाडीतून आहे.

आत्मध्यायोमिताहारी यावदखेद्वादशवत्सरम्। सदा सिद्धासनाभ्यासा द्योगनिष्पत्तिमाप्नुयात्॥

आत्मज्ञानाचा अभ्यासी मीताहारी(जरूर तेवढेच जेवणारा-बोलणारा) व निश्चयीपणे दुसरे न करणारा(नियम पाळणारा) असतो. नेहमी सिद्धासनात राहून अभ्यास करणारा व करत असलेल्या उद्योगाच्या(साधनेच्या)निर्णायक अवस्थेकडे जाणारा असतो.

श्रमदैर्बहुभिः पीठैरलं सिद्धासने सति। प्राणानिलं सावधानं बद्धे केवलाकुम्भके॥

सिद्धासनात बसून मोल्यवान अशी शक्ति(स्त्रीरूप) महतप्रयासाने व खुबिने प्रयत्न करावेत सावधपणे प्राण केवल कुंभकात बांधण्याचा (साधण्याचा) प्रयत्न करावा.

उत्पद्यते विनायासात् स्वयमे वोन्मनी च सा। तथैकस्मिन्नेव बद्धे सिद्धासने सदा।
ग्रन्थित्रयमनायासात् स्वयमेवोपभिद्यते। आसनं सिद्धि सदृशं न कुम्भः केवलो जपः।
न खेचरे समामुद्रा न नाद सदृशो लयः॥

केवल कुंभकामुळे फार प्रयत्न न करता शक्ति उन्मन(जागृत) होण्यास मदत होते.नेहमी सिद्धासनात असावे शक्ति उन्मन कधी होईल यांची वाट पहावी,नाडी व मन यावर आपोआपच ताबा येतो,आसन सिद्ध होते असे लक्षात येते जे फक्त कुंभकाने होते.जप,खेचरी मुद्रा वा नाद लय ह्या मार्गाने केवळ कुंभक कठिण आहे.

गलुफौ च वृषण स्याथ स्वीविन्याः पार्श्वयोः क्षिपेत्। दक्षिणे सव्यगुल्फं तु वामे दक्षिण गुल्फकम्॥
हस्तौ च जान्वोः संस्थाप्य स्वाङ्गुलीस्संप्रसार्य च। व्याप्तवक्त्रो निरीक्षेत नासाग्रं सुसमाहितः।
सिंहासनं भवेदेतत् पूजितं योगिभिः सदा॥

सिद्धासन जे योगीयांना नेहमी पूज्य आहे ते करण्यासाठी घोटा शिवणीजवळ मागे ठेवावेत उजवा डावीकडेच व डांवा उजवीकडेच ठेवावा हातांची ओंजळ एकमेकावर ठेवून दृष्टि नासिकाग्रावर सम ठेवावी.

गलुफौ च वृषणस्यायस्वीविन्याः पार्श्वयोः क्षिपेत्। पार्श्वपादे च पाणिभ्यां दृढं बध्वासु निश्चलः॥
भद्रासनं भवेदेतत् सर्वव्याधिविनाशनम्। गोरक्षासनमित्याहुरिदं वै सिद्धयोगिनः॥

भद्रासनाने सर्वव्याधीचा नाश होतो व गोरक्षासन हे सिद्धयोग्यांसाठी योग्य आहे (ते त्यावर ताबा आणू शकतात)

आसनं त्रिविधं प्रोक्तमेकत्रा वासमेव च। कुशाद्यासनमेकं च सिद्धाद्यासनमेव च॥

आसनांबद्दल सगळीकडे विविध चर्चा असते व ज्याची जशी श्रद्धा तसे आसन असते पण गवतावर सिद्धासन हे एकमेव उत्तम आहे.

यावत्संकल्पितः कालस्तावदेकत्र संवसेत्। क्रोशान्नपर्यटे दूर्ध्वमचलं प्रोच्यते बुधैः॥

संकल्प हे काळानुरूप असतात,भ्रमंति दूरवर करणाऱ्यांसाठी विविध प्रकारचे अन्न(विषय-विचार) प्राप्त होणे हे चांगले नाही.

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमात्मन आसनम्। नात्युच्छ्रितं नाति नीचं चेलाजि न कुशोत्तरम्॥

शुद्ध अशा देशी (प्रदेशात) (योगाभ्यासासाठी उपयुक्त) आसन स्थिर करून अभ्यास करावा.निचांच्या फार मदतीची अपेक्षा करू (घेऊ) नये.

तत्रकौग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः। उपविश्यासने युञ्ज्यात् योगमात्मविशुद्धये॥

मन एकाग्र करून चित्त व इंद्रिय ह्याच्या व्यवहारावर अंकुश आणावा आत्मशुद्धी(पूर्ण शुद्धता) करण्यासाठी आसनावर बसावे.

बधिप्रदेशे मरुभूमिमण्डले सदामरुद्घोषित कीकटस्थले। वल्मीकयुक्ते बहुजीवसङ्कुले किरातभूयिष्ठकुराजमण्डले॥

किटक,वाळवंट,मुंग्या,अनेक प्रकारचे जीव आहेत अथवा वाईट स्त्रिया,वाईट राजवट जे साधकाला बाधक आहे ते टाळावे.

योगसारमञ्जर्याम् - योगासारानुसार

नदंशमशका कीर्णेन च श्वापद सेविते। नदी समुद्रतीरेवा न जलाशय सन्निधौ॥

दंश करणाऱ्या (डास) व प्राणी खाणाऱ्या ,नदी,समुद्र किनारी वा जलाशयाजवळ बसू नये.

श्मशाने चैत्यवृक्षे वा न महाजनसन्निधौ।अराजके देशसन्धौ वल्मीकादि समाकुले॥ इति।

शुचौ देशे मनोरम्ये निश्शठे जनवर्जिते। शोधिते घटिते स्निग्धे निम्नोन्नतविवर्जिते॥

स्मशानभूमीत,पूजा करतात त्या वृक्षाजवळ किवा देवळात,खूप माणसांची वर्दळ असलेल्या ठिकाणी बसू नये.

हठयोगे - हठयोगानुसार

तत्र रम्येमठं कुर्यात् सूक्ष्मद्वारञ्च निर्व्रणम्। प्राकार चेष्टितं शुद्धं बहिजाला समन्वितम्॥

ज्या जागी बसायचे त्याचे द्वार लहान असावे बाहेरून कुंपण असून ते शुद्ध व जाळीदार असावे.

सुगन्ध कुसुमाकीर्णे वितानाशोप शोभिते।तत्रोपधान शय्याद्यैरासनाद्यैः समाकुलम्॥

तेथे सुगंधित पुष्पांनी भरलेली जागा असेल (व ते दृश्य विलोभनीय असेल तर मन प्रसन्न होते) ज्या जागी बसायचे तेथे प्राणीमात्रांचे आवाज(आर्त स्वर) ऐकण्यास मिळावेत (प्राण्यांची वेदना समजावी)

सुधूप वासितं नित्यं गोमयनेपलेपितम्। समित्पुष्पदलोपेतं कन्दमूल फलान्वितम्।

समग्र भस्म रुद्राक्ष कशोदकविभूषितम्।शुद्धान्न व्यञ्जनैः पूर्णं सर्वौषधि समाश्रयम्॥ इति।

शेणाने सारवलेले व कोरडे ,तसेच अनेक पुष्प व कंदमुळे व फळे असावीत.सगळीकडे भस्म, रुद्राक्ष गवत असले तर चांगले ,शुद्ध अन्न, मसाले असलेले व ओषधी असल्यास उत्तम होय.

हठयोगे - हठयोगानुसार

शैवे – अल्पद्वारमरन्ध्रगर्त पिटकंनात्युच्चनीचायतं। सम्यग्गोमयसान्द्रलिप्तममलं निश्शेषबाधोज्झितम्।

बाह्ये मण्टपवेदिकूपरुचिरं प्राकार संवेष्टितं।प्रोक्तं योगिमठस्य लक्षणमिदं सिद्धेर्हठाभ्यासिभिः॥

गुहेचे द्वार छोटे असावे,अनेक लिखितांचे (एवजांचे) निरीक्षण करावे, शेणाच्या जाड थराने शक्य झाल्यास सारवावे,निसर्गिक बाधांपासून रक्षण होईल असे असावे.(उन,वारा,पाऊस) असा हठयोग्याचा मठ असावा अशी लक्षणे सांगितली आहेत.

इति श्रीदत्तात्रेयविरचिते योगसंग्रहे यमनियमासन स्थान निर्णयोनाम प्रथमोऽध्यायः ॥

श्रीदत्तात्रय यांनी रचलेल्या यमनियम नामक व स्थाननिर्णय नावाचा प्रथम अध्याय पुंर्ण झाला

॥नाडी- नाडी ॥

मुख्य नाड्या (१४) - सुषुन्मा,इडां,पिंगला,गांधारी,हस्तजिव्हा,कुहू,सरस्वती, पूषा,शंखिनी,पयस्विनी,वारुणी,अलम्बुषा,विश्र्वोधरा,यशस्विनी.

सुषुन्मा- मूलाधार ते ब्रह्मरंध्र (अग्नीप्रमाणे लाल),सुषुन्मेत अनेक लहान नाड्या असून त्यातील एक वज्रा(वज्रा-सूर्यासारखी वलयांकित,राजस्विक) त्यात चित्रा (चित्रा-फिकट रंग,सात्विक) ह्यात असलेल्या सूक्ष्म पोकळीस(सूर्य,चंद्र,अग्नी हे शब्दब्रह्म) ब्रह्मनाडी म्हणतात.कुंडलिनी जागृत झाल्यावर ह्याच मार्गाने जाते व सहा चक्रे ह्यातच असतात.ह्या (चित्रा) नाडीच्या सर्वात खालच्या भागास ब्रह्मरंध्र म्हणतात (ईश्वराकडे जाण्याचे व्दार) ह्याचे दुसरे टोक मेंदूत (सहस्रदलात) जाते.चित्रा सुषुन्मेत असल्यानेच त्यास ब्रह्मनाडी म्हणतात.ह्यात सहा चक्रे असून विविध रंगी असल्याने ह्यास इंद्रधनु किवा स्वर्गाचा मार्ग म्हणतात.प्राणशक्ती ह्यात स्थिर करून योगी सर्व पापमुक्त होतात व मोक्ष मिळवतात.चित्रा(सुषुन्मा) ह्यातून प्राणशक्ती जाते तेव्हा मनाची स्थिर अवस्था ज्याला उन्मनी अवस्था म्हणतात.सुषुन्मेत काळाचा लय होतो.योगीजन हिच्याच आधाराने मृत्यूवर मात करतात.

मुक्त त्रिवेणी - इडा पिंगला व सुषुन्मा ह्यांच्या संगमाला मुक्त त्रिवेणी म्हणतात. गंगा,यमुना,सरस्वती ह्या इडा पिंगला व सुषुन्मा ह्यात आहेत त्या परत अनाहत व अजन(आज्ञा) चक्राजवळ मिळतात.

इडा व पिंगला - उजवीकडे इडा (चंद्रनाडी) व डावीकडे पिंगला(सूर्यनाडी),डाव्या नाकपुडीतून इडा व उजव्या नाकपुडीतून पिंगला वाहते.पिंगळेने अन्न पचन होते (लालरंगाची अग्नीप्रमाणे),इडा फिकट वर्णी असून पोषण करते म्हणून तिला विश्वरुप किवा शक्तिरूप म्हणतात.जी काळ दर्शविते.

इडा व पिंगळे मधून वाहणाऱ्या प्राणवायूच्या प्रवाहात बदल करता येतो- १) डाव्या बाजूची नाकपुडी बंद करून काही वेळ डाव्या कुशीवर झोपावे.काही वेळाने उठून डावा घोटा डाव्या ढूंगणाखाली ठेऊन डाव्या डाव्या हातावर शरीर झुक्वावे व हात घोट्यावर ठेवावा,कोपराजवळ झुकू नये,मन डावीकडे वळवावी.२)योगदंड (योगी डावा हात ठेवतात तो-u आकाराचा) यावर डावाहात ठेऊन झुकावे.३) खेचरी मुद्रेने (जिभेने) नाकातील प्राण प्रवाह बंद करावा.

नाडीस्थानं च तद्वर्णं प्राण कर्म च विस्तरात्। ज्ञात्वा योगीशनैर्नाडी शुद्धिं सम्यकखे समारभेत्॥

नाडीच्या ठिकाणी प्राणाच्या विविध प्रकारच्या कर्माचा विस्तार होतो.त्यासाठी योग्याने नाडीशुद्धीसाठी त्याचे ज्ञान योग्य व पूर्णपणे करून घ्यावे

तत्र शिवः। सुषुम्नादशमद्वाराहर दाराश्चमध्यमा। नागश्चन्द्र स्वर्गमुखी मशकामध्यनाडिका॥

तसेच शिवांकडे जाण्यासाठी लागणाऱ्या दशमहाद्वारात सुषुन्मा ही मध्य नाडी आहे.ती मध्य नाडी सर्परुपीचंद्र(शक्तिचा मार्ग सर्पासारखा असून योग्याला शांती प्राप्त करून देणारा आहे.) व स्वर्गाकडे जाण्याचे मुख(व्दार) असून दबलेला आहे (तो मार्ग दोन पंख असलेल्या डासांप्रमाणे व त्याने चावलेला भासतो)

पम्पालिनी मराकारी बालशक्ति तपस्विनी। शंखिनी नलिनी गौरी शिखिनी व्यापिनी गुहा॥

तळ्यात (छोट्यारुपात) जसे पाणी असते तशी ही शक्ति बाल्यावस्थेत असून अत्यंत वैराग्यशील व विस्मयकारक असून प्रलयकारी आहे.समुद्राप्रमाणे,कमळाप्रमाणे,गौरीसारखी,कोंबड्यासारखी(आरव करणारी),व्यापक,पोकळ(गुहेसारखी)आहे.

मासोपवासी त्रिपुरात्रिवेणी मन्दाकिनी सर्वरुजापहती। सा कोकिलाभ्राजपदा च सिद्धा वज्राख्यदन्तामरशून्यनावी॥

अनेक दिवस (महिने) उपवास(उपाशी असलेली) करणारी,त्रिपुरवासिनी,तीन नाड्यांच्या संगमावर असलेली,सर्व दुखां:चा नाश करणारी,कोकिळा(अनेक मधुर नाद),तेज:पुंज व सिद्धा,दुर्गा(हृदयात राहणारी) व नामरहित देवता आहे.

अनाकार मुखीकन्द संहारातिग्मसूचिका।शंखिनीशिव जालंध्र वियद्गङ्गोर्ध्व वाहिनी॥

(निश्चित)आकार नसलेली,मुखातून उच्चार करणारी(वाचा),भयंकर संहारापासून रक्षण करणारी,शंखात असणारी (शंख धारिता),शिवरूप,मोहक,प्राणातवास करणारी (आकाशाकडे जाणारी)

पश्चिमोर्ध्व सरित्कारी मुखा कपिलपीलिका।आकुला सिद्धमुनिवन्दिनी ततो मणिकुलं हरिविरिञ्चिगोचरा।
विषमसन्धिरपि वायुसूत्रकं तदनुघटति यद्वासरश्रियम्॥

पश्चिमेकडून उर्ध्व(अपानाची उर्ध्व गती),अथांग(सागराप्रमाणे),रक्तवर्णी व महाकाय,मुख्य,सिद्धाना वंदनीय,डोळ्याचा डोळा,रक्तवर्णी व दूरवर पसरलेली आहे जिचा शेवट समजत नाही.

मरुरिन्द्रमणिमोक्षसाधनी संगमात्र तदेह नायकी।पद्मिनीत्रिदशवल्लभा वियद्ग्रन्थिवंशमणिमार्ग इत्यपि॥

ओसाडजागीसुद्धा नंदनवन फुलावणारी अशी,अलंकारी,साधकांना मोक्ष देणारी,देहाच्या संगतीने नायिका,कमळवासिनी,पवित्र,अर्धांगिनी,वायुरूप (प्राणवायू) अशा पाठीच्या कण्यातून जाणाऱ्या मार्गात अलंकाराप्रमाणे अभिमानास्पद प्रकारे स्थित आहे.

योगसारमञ्जर्याम् –नारदीयेच - योगसारसंग्रह- नारदमुनीमत

ब्रह्मद्वारे त्रयोग्रन्थिर्वामीक पालिनी तथा। त्रिगन्धिर्मत्य सर्वा च मण्डनी स्यादखे मूलिकम्॥

मृणालतन्त्रत्रिलिंगा तथा सर्व रसोऽपि च॥

ब्रह्मद्वाराजवळ तीन ग्रंथित वेष्टित सर्व पालनहारी,साधकांसाठी जो मूळ स्त्रोत,सर्व देहात (मर्त्य) असणारी त्रीगंधा (त्रिगुणा) शक्ति होय.

आदिनाथः।-- आदिनाथ

कन्दमध्ये स्थितानाडी सुषुम्नेति प्रकीर्तिता।चक्रेऽस्मिन्परितोनाड्यस्तिष्ठन्त्या पादमस्तके।

सुषुन्मा नावाची नाडी जिची कीर्ति सगळीकडे आहे ती कंदात (गाठ-गुंता) आहे त्यामुळे संभ्रम निर्माण होतो,पायांच्या (वरच्या बाजूस)डोक्यात (गुदात-शिवणीजवळ) योगचक्रातील नाडी स्थित आहे.

नारायणे - नारायणनुसार

सन्ततं सिराभिश्चलम्पत्या कोशसन्निभम्। तस्यान्ते सुषिरं सूक्ष्मं तस्मिन् सर्वं प्रतिष्ठितम्॥ इति।

नेहमी शिरातील नाडीत (शिर-सहस्त्राकडे जाणारी) स्थित्य असणारी व कोषांत असल्यासारखी भासणारी व सूक्ष्म (कोष ज्याप्रमाणे छिद्रयुक्त त्याप्रमाणे) व पोकळीत(नळीत) स्थापित असलेली.

मुक्तिदेव्यागमेत्युक्ता सुखदा विश्वधारिणी। स्वतः प्रतिष्ठिता पूर्वा सुमनाशुद्धनिर्मला॥

मुक्ति प्रदान करणारी पवित्र शक्ति अशी ही विश्व धारिणी आहे.स्वतः पूर्व दिशेला अतुच्य पदी असणारी सौंदर्यवती शुद्ध व निर्मळ आहे.

पृष्ठमध्ये स्थितानाडी सदा मूर्ध्निव्यवस्थिता।सूक्ष्मा श्रीवैष्णवी शुभ्रा विजया व्यक्तसंज्ञिका॥

पृष्ठभागातून (मणक्यातून) नेहमी सहस्रदलात (मेंदू-कल्पनारुपी आकाश) असणारी नाडी,सूक्ष्म श्रीवैष्णवी,शुभ्र (सुंदर,पांढरी- डाग नसलेली),विजय प्राप्त करून देणारी अशी व्यक्त दशेत आहे.

जिह्वादारा निलचाराचोर्ध्वाध्वाचाति गुप्तका॥

जिव्हा दारातून (मुखातून) ती गुप्तका(गुप्त असलेली)विषारी(तुरंगात-बंधनात)असल्याचा भास होतो.

भैरवः – भैरव

सुधाख्या मध्यगाचैव ब्रह्ममार्गा सरस्वती। त्रिमूर्ति निलया लोक धामा श्रीसर्वसंभवा॥

योगिगम्या खगाकारा मंगलामातृरूपिणी॥ इति।

अमृतमयी अशी मध्यमार्गा व ब्रह्ममार्गातील सरस्वती आहे.जिची तिन्ही रूपे सूर्याप्रमाणे तेजस्वी,नीलवर्णी (आकाशरूप) अंतरिक्षात राहणारी आहे व सर्व कार्य करणारी आहे.

दत्तात्रेयः। दत्तात्रेय

द्यौस्सन्तिश्चैव सङखेक्रान्तिः कारण विश्वधारिणी। प्रज्ञान निलया नित्या साध्या केदार संज्ञिका॥

स्वर्ग निवासिनी,नाद(जयघोष) करून सर्व करणारी विश्व धारण करणारी आहे.सर्व ज्ञान देणारी निलवर्णी (आकाशरूप) व नित्य (लक्ष्मी) पदाला जाणारी आहे.

कैलासश्चैव वैकुण्ठं कालमासाब्दमेव च। विष्णवाद्यनेक नामानि योगशास्त्रेषु निश्चितम्॥ इति।

कैलासात वैकुंठ असल्याप्रमाणे काळाचा घड असल्यासारखे व वैष्णव रूप योगशास्त्रांनी निश्चित केलेल्या अनेक नामांनी युक्त आहे.

शिवयोगे - शिवयोगानुसार

ब्रह्मेन्द्र सात्विकमदातुर सृष्टिवाणीन्वारिद्विलक्षशशिशीतल चन्द्रगङ्गा। स्याद्वारुणी च खदिरा च कलङ्कवामा संहार एव शिववर्य निजाभिधास्युः॥

ब्रह्मलोकातून आलेल्या (इंद्राचा) सात्विक व कामेच्छा असलेल्या दोन लक्ष योजने दूर असलेल्या व चंद्राप्रमाणे प्रकाशमान व शितल व सृष्टीच्या वर्णनात असलेल्या जिचे परमधाम जे शिवांचे स्थान आहे व ज्याची प्राप्ति करून घ्यायची आहे अशा त्या महाशक्तीची आराधना करावी जी (मूलाधारात) मार्गाच्या सुरवातीला आहे.

पिङ्गलाम्भोजिनी सूर्या यमुनाग्निरहस्मृतः। इडा च वाम निश्वासा पिंगलादक्षिणा स्मृतः॥

पिंगळा ही सूर्यनाडी आहे व यमुना ही वेगळी अशी नाडी आहे. इडा ही डावीकडील श्वास बाहेर टाकणारी व पिंगला ही दक्षिणेकडील(उजवी) वेगळी नाडी आहे.

गङ्गा च यमुना चैव चन्द्रसूर्यौ निशादिवौ।सूतकं प्रेतकं चैव पक्षद्वय मुदाहृतम्॥

गंगा यमुना या चंद्र व सूर्य नाड्या जणूं अंधार व दिवस असे दोन पक्ष(भेद) दर्शवितात,जन्म व मृत्यू हे दोन पक्ष आनंद व दुख: दाखवितात.

धर्माधर्मौ तमो रक्तावयष्द्वयमुच्यते।सितासिते वारणासि हंसद्वयपदं विदुः॥

धर्म अधर्म हे अंधारात चाचपडल्यासारखे जवळ व दूर असा भेद दर्शवितात. अध्यामिक शक्ति ही जणूं रोध व अनुकुलता हि हं-सा जोडी दर्शविते.

शिवशक्ति पदं चैव सुषुम्नापाश्वयोः स्थितः॥

शिवशक्ती ही सुषुन्मेत स्थित(पाश्र्व-शिवणीजवळ) आहे.

कलाकाष्ठौ मुहूर्तश्च कारणं विश्वदेहिनौ।पञ्चभूत स्वरूपेते पञ्चब्रह्ममये स्फुटे॥

सूक्ष्म व मोठा ह्या विश्वातील (निश्चित) काळाचा विश्वदेहातील हा करण असून मी त्या पंचभूतांच्या स्वरूपाबद्दल सांगत आहे.

गन्धद्वारे कलाचारे प्रवाहौ जन्महेतकौ।अतिधूमयमाकीर्णौ योगिवश्यौ सनातनौ॥

गंधाप्रमाणे(वासना) काळाचा प्रवाह जन्मास (जन्म हेतु) कारण आहे.(वासना काळानुरूप जन्म घेते.)

अतिधुरात (अंधारात) सनातन धर्मी असा योग्याचा शोध घेणे दुष्कर आहे.(सगळीकडे वासनारूपच दिसते योगी दिसत नाही)

मानसेन समायुक्ता विन्द्रियाणां प्रवर्तकौ ।प्राणापान स्वरूपौ तौ जगत्कर्म प्रवर्तकौ ।
वर्णद्वयात्मकौ शुद्धौ नानावर्णप्रभेदकौ ।पञ्चस्थलसमाविष्टौ त्रिपञ्चप्राणरूपकौ ॥

मनाचा प्रभाव हा इंद्रियांच्या कार्यावर तर प्राण व अपानांचा प्रभाव हा जगद्कार्यावर पडतो. शुध्द असा प्राण व त्याचे अनेक प्रकार आहेत,(मुख्य प्रकार पाच) व ह्या पंचप्राणांचा तीन प्रकारात समावेश आहे. (कफ वात पित्त)

सर्वेषां प्राणिनामेव देहकाल प्रवर्तकौ । प्राणवायुरयं नित्यं कालनिर्णयकारणात् ॥

प्राणवायू हाच नेहमी प्राण्यांच्या देहकालाचा(जीवनाचा)निर्णय निश्चित करतो.

इडायां पिङ्गलायाञ्च श्वासरूपेण वर्तते । एतद् द्वयं विना जीवो न तिष्ठति न संशयः ॥

इडा व पिंगला ह्या श्वासाशी (श्वास-उश्वास) ह्यांच्याशी निगडीत आहेत प्राणी (जीव) त्याशिवाय तग (जिवित) राहू शकत नाहीत.

सुषुम्नाग्नि कलाप्रोक्ता तिसृभिः सर्वदा भवेत् । सुषुम्ना वाहनं तत्र नैव जानन्ति मानवाः ।
तया विदन्ति सुज्ञानं देवाः परमयोगिनः ॥ इति ।

सुषुन्मेतील अग्नि (कुंडलिनी शक्ति) नेहमी सर्व व्याधी निवारक आहे. सुषुन्मेत वाहणाऱ्या शक्तिबद्दल मानवांना फारशी माहिती(कल्पना) नाही.

प्रणवचिन्तामणौ - प्राणचिंतामणी

शरीरादधिकः श्वासो निर्गमो द्वादशांगुलः । प्रवेशेऽष्टांगुलोमध्ये विनष्टश्चतुरंगलः ॥

शरीरातील श्वास (उश्वास) हा बारा अंगुळे (अंगुळे-योगातील मोजमाप) बाहेर जातो. श्वास हा आठ अंगुळे वेगाने प्रवेश करतो व विचारांचा वा मनाचा विलोप करतो.

शारीरे - शरीरात

षष्ट्युत्तरैश्च त्रिशतैः श्वासैरेका तु नाडिका । पञ्चभिर्नाडिकाभिश्च राशिरेकः प्रकीर्तितः ॥

६०४०० वेळा नाड्यांमधून श्वास जातो.पाचनाड्यांच्या मध्ये (पंचप्राणात) राशिंचा (ज्योतिषातील) प्रभाव होतो.

दिनं जानाति मेषान्तैरेवं द्वादश राशिभिः । चर स्थिरो भयात्मानो भवेयुश्श्वास संयुतः ॥

द्वादश (१२) राशी,मेषापासून दिवस (सुर्योदयापासून) सुरु होतो,चराचर सृष्टित जी हालचाल होते ती श्वासाशी निगडीत आहे.

चरात्मकास्तु चत्वारो वामभागे व्यवस्थिताः । स्थिरात्मकाश्च याम्येस्युरुभयत्रो भयात्मकः ।
मेष कर्कटकश्चैव मकरश्चतुला तथा ॥

चराचराला भयापासून वाचविणाऱ्या शक्तिचा निवास हा मूलाधारात स्थित आहे त्यामुळे स्थिरतेसाठी व भयापासून रक्षणासाठी (विविध राशीप्रभावांमुळे भय उत्पन्न होते.) त्या बारा राशी मेष,कर्क,मकर,तुला इत्यादि होत.

चत्वारो राशयस्त्वेते वामभागे व्यवस्थिताः। वृश्चिकश्च वृषः सिंहः कुम्भोदक्षिणभागतः॥

दक्षिण भागात चार राशी असून त्या वृषिक,कुंभ,सिंह,कुंभ ह्या होत.

कन्यामीनौ धनुर्युग्ममुभयत्र व्यवस्थिता।भूतं भव्यं भविष्यं च शुभाशुभफलं तथा॥

कन्या,मीन,धनु ह्याचे ही तेथे स्थान आहे त्यामुळे भूत,भविष्य व वर्तमान ह्याची शुभाशुभ फळे त्यामुळे मिळतात.

राशिष्वेतेषु भूतेषु विज्ञातव्यं ग्रहोदयात् । एककै स्मिन् भवन्त्यत्र राशौ भूतानि पञ्च च॥

ग्रहांचे योग्य ज्ञान राशिंमुळे होते, एकच नाद सगळीकडे (त्यांचाच प्रभाव) व्यापतो, ज्या राशीमध्ये तेथील चराचर असतात तेव्हा त्या राशीचे गुणधर्म त्यात मिसळतात.

वायुर्वह्निस्तथा भूमिरापः खमिति पञ्चवै। सर्वेषामपि राशीनां वायव्याद्यातु नाडिका॥

राशींचे गुणधर्म प्रभाव वायू,भूमी(घन),अग्नी,आप यात मिसळतात.तोच प्रभाव नाड्यांमधून वाहणाऱ्या वायू,भूमी(घन),अग्नी,आप यावर सुद्धा पडतो.

द्वितीया नाडिका ज्ञेयी तृतीया पार्थिवामता। चतुर्थी वारुणी ज्ञेया व्योमाख्या पञ्चमी स्मृता॥

नाड्या,देह(त्याबद्दलची मते),वायुरूप व आकाश ह्याबद्दल ज्ञान हे अनुक्रमे दुसऱ्या ते पाचव्या क्रमाने होते.(सांगतात)

नासे पार्श्वे वहेद्वायु वायंव्यां शेषुराशिषु।आग्नेयांशे चरत्यूर्ध्वे पार्थिवेस्तम्बपार्श्वतः॥

नासिका व पाश्र्व(गुद) यातून वायूचे वाहन होते.वायव्येकडे (उ-पु) शेषांचे(स्मरणाचे सार)शीर (सर्पाचे),अग्नेयेकडे दृष्टि (जाण्याचा मार्ग) व पाठीमागे(पश्चिम)कणा (पाठीचा)

डाव्या पायाचा तळवा शिवणीजवळ ठेवावा तसेच डावा पाय सुद्धा ठेवावा.

पूरयेन्मुखतो वायुं हृदये चिबुकं दृढम्। निभृत्य योनिमाकुञ्च्य मनोमध्ये नियोजयेत्॥

मुखातील वायू हृदयात व हनुवटी घट्ट धरावी.शिवणीजवळ(गुद)आकुंचन ठेऊन मनातसुद्धा ठेवावे.

रेचयेच्च शनैरेवं महाबन्धोऽयमुच्यते। अमुंयोनि महाबन्धं सर्वसिद्धि प्रदायकम्॥

हळूहळू (श्वास-उश्वास) ह्यांनी रेचक करून महाबंध करणे उत्तम. शिवणीजवळचा महाबंध सर्वसिद्धी प्रदान करणारा आहे.

सव्याङ्गे च समभ्यस्य दक्षिणे च समभ्यसेत्।अयं च सर्वनाडीनामूर्ध्वगति विबोधकः॥

अंग सरळ पण दक्षिणेकडे असल्याप्रमाणे ठेऊन(उजवीकडे वळलेले) सर्व नाड्यांच्या उर्ध्व गतीचा बोध घ्यावा.

त्रिवेणी संगमद्वारा केदारं प्रापयेन्मनः। रूपलावण्यसम्पन्ना यथास्त्री पुरुषं विना॥

त्रिवेणी संगमाने (मूलाधार- तिन्ही नाड्या) केदार (शिव- ब्राह्मण) प्राप्त करून घ्यावे.

महामुद्रो महाबन्धो महावेधं विना तथा। महावेधं प्रवक्ष्यामि यथा तौ सिध्यतस्ततः॥

तेथे (शिवस्थानात) महामुद्रा महाबंध महावेध काही नाही, महावेध मी सिद्धांच्यासाठी येथे सांगतो.

महाबन्धस्थितो योगी धृत्वापूरकमेवधीः। वायुनागतिमाहृत्य निभृतं कण्ठ मुद्रया॥

महाबंधात योग्याने बसून पूरकांदि करावेत नागासारखा वायू कंठ मुद्रेत पूर्णपणे राहतो.

समहस्त युगो भूमौ स्फिजासन्ताऽयेच्छनैः। घटि द्वयं समाक्रम्य वायुः स्फुरति सत्वरः॥ सोमसूर्याग्नि संबन्धो जायते चामृतं च वै॥

दोन्ही हात जोडीने जमिनीवर व ढूंगणाकडील भाग नीट लांब केल्यावर (उचलून) ढूंगणाच्या (दोन्हीकडून) बाजूने क्रमश: वायूचे स्फुरण लगेच होते. चंद्र व सूर्य अग्नि यांच्या संबंधापासून अमृत मिळते.

मृतावस्था समुत्पत्तौ ततो वायुं विरेचयेत्।महद्वेधोऽयमभ्यस्तो महासिद्धि प्रदायकः॥

मृतावस्थेत (शवासन) चांगल्या अवस्थेत (उत्तम स्वास्थ्य असेल) तर वायू हळूहळू निघून जातो.अतिशय खोलवर (गाढा अभ्यास) अश्या अभ्यासाने महासिद्धी प्राप्त होतात.

वलीपलितवेगघ्नः सेव्यते साधकोत्तमैः।महामुद्रा त्रयं गुह्यं जरामृत्यु निवारणम्॥

सुरकुत्या व वार्धक्य रहित शरीर साधकास वेगाने प्राप्त होते,महामुद्रेचे तिनही भागांचे रोग व मृत्यू निवारण हेच रहस्य आहे.

वह्नि वृद्धिकरं चैव ह्यणिमादि गुणप्रदम्।अष्टधादीयंचैतद्यां यामं यामं दिने दिने॥ पुण्य चञ्चार सन्दायी पापौघ बिदुरं सदा॥

जसा जसा अग्नि प्रज्वलित होतो,तसतसे नाड्या गुणरूप होतात.अष्टधाप्रकृतीचा जोर चढत्या क्रमाने दिवसेंदिवस ओसरतो.पुण्याचा संचार वाढून पाप निघून जाते.(नाडीशुद्धी होते)

साम्यक्छिक्षावतामेव प्रथमं स्वल्पसाधने। वह्निस्त्रीपथसेवानामादौवर्जनमाचरेत्॥

अल्प साधनाने पूर्णपणे अस्थिरता निघून जाते असे म्हणतात. अग्नी प्रज्वलीत ठेवण्यासाठी स्त्रीकडे (स्त्रीपथ) जाणाऱ्या व उपभोग असणाऱ्या गोष्टी वर्जित कराव्यात.

च्छेदन दोहन चालैः कण्ठकाल क्रमेण वर्धयेत् तावत्। भ्रूमध्यं स्पृशति तदा नित्याभ्यासेन खेचरी सिद्धिः॥

खेचरी साठी लागणाऱ्या (जीभ) छेद घेणे व त्यास वाढवणे ह्यासाठी काळ घालवावा,जेव्हा भृमध्यापर्यंत स्पर्श होईल तोवर (जीभ) नेहमी अभ्यास करावा व खेचरी सिद्धी प्राप्त करावी.

कपाल कुहरे सिद्धिजिह्वा प्रविष्टा विपरीतगा। भ्रुवोरन्तर्गता दृष्टिर्मुद्रा भवति खेचरी॥

जीभ उलटी करून घशाच्या आत नेणे असा जिव्हेवरील ताबा आणणे व त्यावेळी भृकुटीच्या आत दृष्टिची मुद्रा असणे हीच खेचरी मुद्रा होय.(जिव्हेने नासिकेकडून येणारा वायू रोखणे)

कलां पराङखेमुखी कृत्वा त्रिपथे परियोजयेत्। सा भवेत्खेचरीमुद्रा व्योमचक्रं तदुच्यते॥

पराङ्मुख कलेने (जिव्हा घशात) करून तिन्हीच्या मार्गात ठेवावी (नाकातुन श्वास बंद) अशा तऱ्हेने खेचरी मुद्रा आकाशचक्रासाठी उत्तम होय.

रसनामूर्ध्वगां कृत्वा क्षणं वा यदि तिष्ठति।क्षणेन मुच्यते योगी व्याधि मृत्यु जरादिभिः॥

जीभ जर मागे सोडून मुर्धेकडे केली व काही काळ थांबले तर क्षणात योगी व्याधि,मृत्यू व वार्धक्य ह्यांनी मुक्त होतो.

न रागे मरणं तस्य न निद्रा न क्षुधा तृषा। बध्यते न स कालेन लिप्यते न स कर्मणा॥

त्यानंतर मरण भिती निद्रा भूक संपते काळाचे बंधन संपते व कर्मात बांधला जात नाही.

बाध्यते न स केनापि यस्य मुद्रास्ति खेचरी। चित्तं चरति वै यस्मात् जिह्वा चरति खे गता॥

खेचरी मुद्रेचे सुद्धा बंधन राहत नाही जेथे जिव्हा जाते तेथेच चित्त राहते.

तेनैवां खेचरी नाम मुनिसिद्धैर्नमस्कृता। खेचर्या मुद्रितं येन विवरंलम्बकोर्ध्वतः॥

त्यानंतर खेचरी मुद्रेचे नाव सुद्धा नाहीसे होते अशा सिद्ध मुनींना नमस्कार असो.खेचरी मुद्रा ही लांब अशा विवरात उर्ध्व होते.

तस्य नक्षरते बिन्दुः कामिन्या श्लेषितस्य च। चलितोऽपि यथाबिन्दुः संप्राप्तो योनिमण्डलम्॥

कामरूप अश्या बिंदूचा नाश होत नाही,जर बिंदू वेगळा झाला तर योनि मंडलात प्राप्त होतो.

वज्रत्यूर्ध्वं यथाशक्ति निबद्धो योनिमुद्रया ॥ऊर्ध्वजिह्वा स्थिरो भूत्वा सोमपानं करोति यः। मासार्धेन न सन्देहो मृत्युं जयति योगवित्॥

जरी ऊर्ध्व जाणे कठीण असेल तरी यथाशक्ती योनिमुद्रेने त्यास बांधावे,जिव्हा ऊर्ध्व करून स्थिर व्हावे व अमृतपान करावे.एक महिन्यात मृत्यूवर विजय प्राप्त होतो ह्यात संशय नाही.

नित्यं सोमकलापूर्णं देही देहं न मञ्चु ति। गोमांसं भक्षयेन्नित्यं पिबेदमरवारुणीम्॥ कुलीनं तमहं मन्ये इतरे कुलघातकाः। गोशब्देनोदिता जिह्वा तत्प्रवेशो हि तालुके॥

नित्य अमृतपान करणारा पूर्णचंद्र देहात असतो पण निश्चितपणे तो देहरूपाने देही नाही हे विश्वासाने सांगू शकतो. गोमांस (सात्विक) नित्य खाणारा व वारा पिणारा कुलीन समजाला जातो.इतर कुलाघातक होत.जिव्हा टाळूत प्रवेश करताच शुभ शब्द जिव्हेने येण्यासाठी अनुकुलता येते

गोमांसभक्षणं तत्तु महापातक नाशनम्। जिह्वा प्रवेशसंभूता वह्निनोत्तापिताखलु॥

गोमांस भक्षण ह्यासारख्या महापातकाचा नाश सहज होतो जेथे जिव्हा प्रवेश होतो तेथे अग्निपेक्षा वडील(मोठे) कोण आहे.

चन्द्राति स्त्रवति यः सारस्सस्वेदोमरवारुणी। बन्धो येन सुषुम्नायां प्राणस्तुडखेढीयते यतः॥

मृत्यू टाळणाऱ्या अमृताचा थेंब त्या अमृतडोहातून चंद्रबिंदू सारखा वाहतो.सुषुन्मा नाडीच्या बंधामुळे प्राणरूप कुंडली सर्प शिवस्थानाकडे जातो.

तस्या दुड्याणनामायं योगिभिः समुदाहृतः। उड्याणं कुरुते यस्मात् अविश्रान्तो महाखगः॥

तसेच कुर्म नावाने माहित असलेल्या योगाने, योगी प्राण त्यादिशेने वर नेतात, त्यानंतर नेहमी न थकता पक्ष्याप्रमाणे उड्डाण करतात (नेहमी ऊर्ध्व राहतात.)

उड्याणं च तदेव स्यात् तत्र बन्धो निगद्यते। उदरे पश्चिमं ताणं नाभेरूर्ध्वं च कारयेत्॥

म्हणूनच त्यास उड्डाणबंध असे नाव आहे. उदर मागे ताणून (पोट आत घेणे) नाभी ऊर्ध्व करावी.

उडिखेडयाणमिदं बन्धो मृत्युमातङ्ग केसरी। उडिखेडयान्तु सहजा गुरुणा कथितं सदा॥

हिनांचा शिरोमणी अश्या मृत्यूस मारण्यासाठी उडीयानबंध योग्य आहे अनेक गुरूंनी उडीयानाबद्दल सांगितले आहे.

अभ्यसेदुडिखेडयाणं तु वृद्धोऽपि तरुणो भवेत्। नाभेरूर्ध्वमधश्चापि ताणं कुर्यात् प्रयत्नतः।
षण्मासमभ्यसेन्नित्यं जयत्येव न संशयः॥

उडीयानाच्या अभ्यासाने वृद्ध तरुण होतो, नाभी ऊर्ध्व करताना प्रयत्नाने ताण द्यावा,सहामहिने नित्य अभ्यासाने नि:संशय जय होतो.

सति पद्मासने पद्मौ कराभ्यां धारयेदखे दृढम्। गुल्फ देशे समीपेऽथ गुदं तत्र प्रपीडयेत्॥

पद्मासनात पाय व हात दृढ ठेवावेत व शिवणी जवळ जोराने दाब द्यावा.

पश्चिमे ताणमुदरे काययेदखे हृदये गले। शनैश्शनैस्तदा प्राणस्तुन्दस्संधिन्न गच्छति॥

पोट मागे ताणल्यावर जवळजवळ हृदयापर्यंत ओढावे. हळूहळू (शनैशनै) प्राण (श्वास) निघून (रेचक क्रिया होते) निश्चितपणे जातो.

सर्वेषामेव बन्धानां उमेसा उडिखेडयाण नामकः। उडखेडीयाणकृते बन्धे मुक्तिः स्वाभाविकी भवेत्॥

सर्व बंधनात उडीयान हा शिवरूप आहे ज्याने मुक्ती मिळणे निसर्गिक आहे.

पार्ष्णिभागेन संपीड्य योनिमाकुञ्चयेदखे गुदम्।अपानमूर्ध्वमाकृष्यमूलबन्धोऽयमुच्यते।अधो गतिरपानं वैह्यूर्ध्वगं कुरुते बलात्॥आकुञ्चनेन तं प्राहुर्मूलबन्धं च योगिनः। गुदं पार्ष्ण्या तु संपीड्य वायुमाकुंचयेदखे बलात्॥

शिवणीवर दाब देऊन तेथील भाग वर खेचावा,मुलबंधाने हा अपानवायुस ऊर्ध्व करण्यासाठी उत्तम होय.ज्याने खाली जाणारा वायू जोराने वर जातो. म्हणूनच योगीजन मुलबंधात आकुंचन करतात.

वारं वारं यथा चोर्ध्वं समायाति समीरणः। प्राणापानौ नादबिन्दूमूलबंधो न चैकतः॥

असे वारंवर केल्याने दोन्ही वायू एकत्र होतात. प्राण व अपानाचा नादबिंदू मुलबंधाकडे जात नाही

गत्वा योगस्य संसिद्धिं गच्छतो नात्रसंशयः। आपन प्राणयोरैक्यात् क्षयान्मूत्र पुरीषयोः॥

योगाची सिद्धी नि:संशय होते अपान व प्राणाच्या ऐक्यात मलमुत्र खूपच कमी होते.

युवा भवति वृद्धोऽपि सततं मूलबंधनात्। अपाने चोर्ध्वगे जाते प्रयाते वह्निमण्डले॥ तदानल शिखाशीघ्रं वर्धते वायुना सह॥ ततो यावद्वह्नपानौ प्राणमूर्ध्वस्वरूपकम्॥

नेहमी मुलंबंध करून वृद्ध युवा होतात अपान उर्ध्व होऊन अग्नि मंडलाकडे जातो.तसेच शिखात(मेंदू) वायूची पटकन वाढ होते.तसेच हृदयातील प्राण ऊर्ध्व होतात.

तेनात्यन्तं प्रदीप्तस्य ज्वलनो देहिनस्तथा। तेन कुण्डलिनीसुप्ता सन्तप्ता संप्रबुध्यते।
दण्डाहत भुजंगीष निश्वस्य ऋजुतां व्रजेत्॥

ज्याच्या (मुलबंधाने) उष्णतेत वाढ होऊन देहातील उष्णता वाढते, ज्याने कुंडलिनी जी सुप्त असते ति जागृत होते व ति दंडासारखी नागीण रागावून भीतीदायक होते.

बिलप्रविष्टेव ततो ब्रह्म नाड्यन्तरं व्रजेत्॥ तस्मान्नित्यं मूलबन्धः कर्तव्यो योगिभिः सदा॥

अतिशय ताकतीने ति ब्रह्मनाडीत शिरते.त्यामुळे मुलबंध हे जणु नेहमीचे योग्यांचे कर्तव्य होते.

पाताले यद्वियति सुषिरं मेरुमूले तदस्मिन्। तत्तच्चैतत् प्रवदति सुधीः संमुखं निम्नगानाम्।
चन्द्राधारा स्त्रवति वपुषस्तेन मत्युर्नराणां। संबध्नीयात् सुकरणमृदा नान्यथा काय सिद्धिः॥

मेरुमुलात आलेली पोकळ नाडी जणू पाताळातून दोन्हीच्या मधून आल्यासारखी भासते. ज्यातून चेतना देणारे अमृत खालच्या मुखात येते.

कण्ठमाकुञ्च्य हृदये स्थापयेदखे दृढमिच्छया। बन्धो जालंधराख्योऽयममृताप्याय कारकः॥

कंठाचे आकुंचन करून हृदयात दृढ इच्छा धरावी. जालंधर बंद हा अमृत प्राप्त करण्यास कारणीभूत आहे.

बध्नाति हि सिरो जालमधोगामी नभोजलम्। ततो जालंधरो बन्धः कण्ठदुःखौघनाशनः॥

शिरेच्या बंधनाने आकाशातील (अमृत) मधील जाळ्यात (शिरात) जाते. तसेच जालंधर बंध हा कंठातील दु:ख नाहीसे करतो.

जालन्धरे कृते बन्धे कण्ठसंकोचलक्षणे। न पीयूषः पतत्यग्नौ न च वायुः प्रवाति हि॥

जालंधर बंध कंठाच्या संकोचाचे लक्षण आहे.ज्याने अमृत खाली येते, वायू अप्रवाहित होतो.

कण्ठसंकोचने नैव द्विनाड्यो स्तम्भयेदखे दृढम्। अयं बन्धो मया प्रोक्तः षोडशाधार बन्धनम्॥

कंठ संकोचाने दोन्ही नाड्या दृढ करण्यास अडचण नाही असा बंध,मी सांगितला,जो सहांच्या आधाराचा(चक्रे) सुद्धा बंध आहे.

बन्धत्रयमिदं श्रेष्ठं महासिद्ध निषेवितम्। सर्वेषां हठ तन्त्राणां साधनं योगिनो विदुः॥

बंधामधील हा श्रेष्ठ बंध असून महासिद्ध ह्याचा अभ्यास करतात. सर्व हठ योग तंत्रातील साधन असून योगीजन त्याचा वापर करतात.

अधस्यात् कुञ्चने नाशुकण्ठसंकोचने कृते। मध्ये पश्चिमताणने स्यात्प्राणो ब्रह्मनाडिगः॥

खाली (मुलात) त्रिकोणात कंठ संकोच नाहीसा होतो व पोट आत घेण्याने प्राण ब्रह्मनाडीत जातो.

मूल स्थानं समाकुञ्च्य चोडिखेडयाणं तु कारयेत्। इडां च पिङ्गलां बध्वा वाहयेत् पश्चिमं पदम्॥

मुलस्थानात आकुंचन करून तु उडीयान(बंध)कर. इडा व पिंगला ह्या बंधाने पश्चिमेकडे वाहतात.

अनेनैव विधानेन प्रयाति पवनो लयम्। ततो न जायते मृत्युर्जरा रागोदिकं तथा॥

अनेक प्रकारांनी पवनाचा लय करावा ज्याने मृत्यू व रोग होत नाहीत.

ऊर्ध्वनाभेरधस्तालुरूर्ध्वं भानुरधश्शशी। करिणी विपरीताख्या गुरुवाक्येन लभ्यते॥ करिणी विपरीताख्या सर्वव्याधिविनाशिनी। नित्यमभ्यासयुक्तस्य जठराग्नि विवर्धिनी। आहारो बहुलस्तस्य संपाद्यः साधकस्य तु॥

ऊर्ध्व जागीच्या साठ्यात असलेल्याचा चंद्राप्रमाणे तेजस्वी प्रकाश आहे,विपरीत (प्रवाहाविरुद्ध) काम गुरूच्या वाक्याने शक्य आहे. ज्याने सर्व व्याधिंचा नाश होतो.नित्य अभ्यासाने जठराग्नीत वाढ होते.बराच आहार साधक पचवू शकतो.

अल्पाहारो यदि भवेदग्निर्देहं दहेत् क्रमात्। अधः शिराश्चोर्ध्वपादः क्षणं स्यात् प्रथमे दिने॥ वलिश्चपलितश्चैव षण्मासार्ध्वेन दृश्यते॥

अल्पआहार करून जर तु जर हळुहळु देहापासुन वेगळा झालास तर शिर्षासन क्षणात,प्रथम दिवशीच शक्य होईल,सुरकुत्या व वार्धक्य रहित सहामहिन्यात होतो असे दिसेल.

याममात्रं तु यो नित्यमभ्यसेत् स तु कालजित्। स्वेच्छया वर्तमानोऽपि योगोक्तैर्नियमैर्विना॥

ह्या तऱ्हेने तु अभ्यास केल्यानंतर तु काळाला जिंकू शकतोस व स्वेच्छेने वर्तमानात योगाच्या नियमाशिवाय वर्तन करू शकतोस(योगासाठी असलेले नियम बंधन नाहीसे होते)

वज्रोलिं यो विजानाति स योगी सिद्धि भाजनम्। पुच्छं प्रगृह्य भुजगीं सुप्तामुद्बोधयेत् सुधीः॥

अश्या तऱ्हेने वज्रोलीला न जाणणारे योगी सिद्धिंची इच्छा करतात. आपल्या शेपटीच्या स्थानापासून ति सर्पिणी सुप्त असते ति तेथून वर जाते व अमृत देते.

निद्रां विहाय सा ऋज्वी ऊर्ध्वमुत्तिष्ठते हठात्। वितस्ति प्रमितं दीर्घं विस्तारं चतुरगुंलम्॥

निद्रेत असलेली ति (कुंडली) भयंकर असून हठयोगात ऊर्ध्व दिशेने उठून उभी राहते.

मृदुलं धवलं दिव्यं प्रोक्तं वेष्टनाम्बरलक्षणम्। भानोराकुञ्चनं कुर्यात् कुण्डलीं चालयेत् ततः॥

आकाशाला झाकणारे (वेढलेले) ते नाजूक,पांढरे व दिव्य आहे असे म्हणतात,ज्याप्रमाणे कल्पना करावी त्याप्रमाणे कुंडलिनी चालते.

मृत्यु वक्रगतस्यापि तस्य मृत्युभयं कुतः। नासादक्षिणमार्गवाहि पवनात् प्राणोऽतिदीर्घाकृतिः
चन्द्राम्भः परिपूरिता मतृ तनुः प्राद्धण्टिकायां सदा। विद्यात्कान्ति विशालवह्नि वशगान् भ्रूरंध्रनाडीगणान्
तंकायं कुरुते सुवर्णरुचिरं पूर्णद्रुमस्कन्धवत्॥

जर मृत्यूलाच वेसण बसते तर मृत्यूभय राहतेच कुठे,नासिकेतून दक्षिण (उजवीकडे) दिशेने वाहणाऱ्या वायूत प्राण दिर्घ होईल.चंद्र आपल्या पूर्ण कलेत जातो व शरीर त्याचप्रमाणे होण्याकडे कायेची वाटचाल होते.(काया तेजस्वी व शितल),ज्ञानरूप व तेजस्वी शरीर,आवाजावर ताबा,भृकुटी नाडी मुळे काया सुवर्णासारखी व किल्ल्यासारखी दिमाखदार दिसते.

कुण्डलीं चालयित्वाथ कुर्यादखे भस्त्रां विशेषतः। एवमभ्यासतो नित्यं यमिनः शक्यते यमः॥

कुंडलिनी चलनासाठी भस्त्रिकेची (प्राणायाम) सुरवात विशेषतः करावी. अश्या रीतीने अभ्यास केल्यास स्वतःचा ताबा मिळवून शक्ति चालविणे शक्य होईल.

तदाभ्यसेत् सूर्यभेदमुज्जीयां शीतलीं तथा। एवमभ्यास युक्तस्य दिव्यकायं भवेद्ध्रुवम्॥

सूर्यभेदनाच्या सुरवातीपासून चंद्रभेदापर्यंत अभ्यास करावा अश्या तऱ्हेने अभ्यास केल्यास दिव्यकाया प्राप्त होते.

मुहूर्तद्वयपर्यन्तं निर्भयाच्चालनादसौ। ऊर्ध्वमाकुंचते किंचित् सुषुम्नां कुण्डलीं गताम्॥

त्या दोन्हीच्या भेदांपर्यंत,बंधनातून मुक्त होण्यासाठी निर्भय व राक्षसी (अतोनात) वाटचाल करावी,त्यानंतर ऊर्ध्वभाग किंचित आक्रसून घ्यावा ज्याने कुंडलिनी सुषुन्मेत जाईल-प्रवेश करेल.

तेन कुण्डलिनी शक्तिः सुषुम्नायाः समुद्धृताः। जठाति तस्मात् प्राणोऽयं सुषुम्ना व्रजति स्वतः॥

सुषुन्मेत कुंडलिनी शक्ति पूर्णरूप धारण करेल,त्या संगमावर सुषुन्मा प्राणशक्ति पूर्णत: धारण करते.

तस्मात् संचालयेन्नित्यं शंभुगर्भामरुंधतीम्। यस्याः सञ्चालनेनाशु योगीरोगैः प्रमुच्यते॥

त्यानंतर शक्ति(अरुंधती)नित्य संचलित होऊन शंभुस्थानाकडे जाते. अश्या तऱ्हेने शक्ति संचलित झाली तर योगी रोगमुक्त होतो.

येन संचालिताशक्तिः स योगी सिद्धचालनम्। किमत्र बहुनोक्तेन कालं जयति लीलया।

जेव्हा शक्ति संचलित होते तेव्हा योगी सिद्धींचा उपयोग करू शकतात,बहुतेक जणांनी,काळावर विजय मिळतो असे म्हंटले आहे.

वज्रोल्यादि त्रयं पूर्वं निन्दन्तं तत्ववादिभिः ॥

वज्रोली व त्या सारख्या इतर क्रियांची पूर्वीच्या तत्ववाद्यांनी निंदा केली आहे.

कापालिकमतत्वेन योगसारेण लेखितम्। इति मुद्रा दशप्रोक्ता चादिनाथने शम्भुना।

करणे सर्वसिद्धिः स्यान्नचैकापि क्षयो भवेत्॥ इति।

कापालिक (पंथ) तत्व मानण्यारांनी योगासार लिहिले आहे अशा दहामुद्रा आदिनाथ शंभू (महादेव) ह्यांनी सांगितल्या आहेत. ह्या सर्वसिद्धिंचा उपयोग (दुरुपयोग) केल्यास त्याच जागी त्याच्या अधोगतीस सुरवात होते.

॥ इति यागेसारसंग्रहे हठयोग स्वरूपनिरूपणं नाम दशमोध्यायः ॥

अशारीतीने योगसारसंग्रहातील हठयोग स्वरूपनिरुपण नावाचा दहावा अध्याय समाप्त झाला.

राजयोग स्वरूप निरुपण

राजयोगं विना पृथ्वी राजयोगं विनानिशि। राजयोगं विना मुद्रा विचित्रापि न राजते॥

पृथ्वी राजयोगाशिवाय नाही व राजयोगाशिवाय शक्ति नाही. राजयोगाशिवाय मुद्रा नाही व त्याशिवाय स्वछय पांढऱ्या हरणाची प्राप्ति नाही.

न भेदः शिवयोगस्य राजयोगस्य तत्वतः। बहिर्मुद्रांकितं पूर्वं बहिर्योगं च तन्मतम्॥

राजयोगात व शिवयोगात तत्वतः भेद नाही पहिला बाह्यमुद्रा असलेला म्हणून बहिर्योग म्हणून मानला जातो.

अंतर्मुखाख्यमपरमन्तर्योगः स एव हि। राजयोगः स कथितस्स एव मुनिपुङ्गव॥ इति॥

अंतर्मुख असलेल्यात परम अंतर्मय योग,असा राजयोग मुख्य मुनींनी सांगितला आहे.

नन्दिकेश्वरतारावलयाम्- बहिर्मुद्रापरिज्ञानाद्योगस्तारक उच्यते॥ अन्तर्मुद्रापरिज्ञानादमनस्क इतीरितः॥

नंदिकेश्वर (शिव) ह्याच्या वलयाने युक्त असा बर्हीमुद्रा योग संसारीकाना ज्ञानांसाठी उत्तम आहे.अंतर्मुद्रा असलेला मनाच्या ज्ञानासाठी उत्तम होय.

बहिर्मुद्रापुरा प्रोक्ता चादिनाथेन शम्भुना।अन्तर्मुद्रां प्रवक्ष्यामि योगशांकरवर्तिनीम्॥

पूर्ण बर्हीमुद्रा योग आदिनाथानी सांगितला आहे. अंर्तमुद्रा योगशांकर ह्याने सांगितलेला मी तुला सांगतो.

राजयोगः समाधिश्चोन्मनी च मनोन्मनी। शिवयोगो लयस्तत्वं शून्याशून्यं निरञ्जनम्।

अमनस्कं यथा चैतन्निरालम्बं निरञ्जनम्। जीवन्मुक्तिश्च सहजमित्यदिर्ह्येक वाचकम्॥

राजयोगाने उन्मन झालेल्या मनाला समाधी स्थिति येते. शिवयोगात(लययोग) लय तत्वाचा उपयोग करतात.शून्याला शून्य (आकाशाभास घालावणारे) करून निरंजन स्थिति प्राप्त करून देणारा हा योग आहे.ज्यास अमनस्क किंवा निरालंब (आधार रहित) निरंजन योग सुद्धा म्हणतात.

राजानन्दीप्यमानन्तं परब्रह्माणमव्ययम्। देहिनं प्रापयेद्यस्तु राजयोगस्स उच्यते॥

नंदी सारख्या राजांनी मान्य केलेला परब्रह्मात सर्वाचा क्षय करणारा या देहात प्राप्त करण्यासाठी राजयोग उत्तम आहे.

यदा संक्षीयते प्राणः मानसञ्च प्रलीयते। यदा समरसत्वं तत् समाधिरभिधीयते॥

प्राण जर अदृश्य झाले तर मनाचा लय होतो. ज्याप्रकारे समरस व्हावे त्याप्रकारे समाधी प्राप्त होते.

दृग् दृश्य विवेके - डोळ्याच्या कडेपासून दृश्य

मनसो वृत्ति शुन्यस्य ब्रह्माकारतयास्थितिः। असंप्रज्ञातनामासौ समाधिरभिधीयते॥ इति।

मनाच्या वृत्ति शून्यात ब्रह्माकार स्थिति येते. महिन्यात असंप्रज्ञ समाधी प्राप्त होते.

व्यासभाष्ये - व्यासभाष्य

विरामप्रत्ययाभ्यास पूर्वकसंस्कारशेषोऽन्यस्सर्ववृत्ति प्रत्यस्तमये निराधे चित्तस्य समाधिरसं प्रज्ञातः॥

प्रत्याहार अभ्यास येथे संपतो,पूर्वीच्या राहिलेल्या शेष संस्कारात सर्ववृत्ति नाहीश्या झालेली, परिपक्व, ज्यात चित्ताचा पूर्ण निरोध झाला आहे अशी,समाधी प्राप्त झाल्याचे समजते.

उत्तरगीतायाम् - उत्तरगीता

प्रमाशून्यं मनः शून्यं बुद्धिशून्यमनामयम्। सर्वशून्यं निराकारं समाधिस्थस्य लक्षणम्॥

ज्ञान (जाणणे) शून्य,मन शुन्य,बुद्धि शून्य,असे मनाने दिसते.सर्व शून्य(स्तंभ) स्वरूप निराकार होते हे समाधीचे लक्षण आहे.

दत्तः दत्त

नेत्र त्रयोन्मेषनिमेष शून्यैर्वायुर्यमावर्जितरेचकपूरैः। मनश्च सङ्कल्पविकल्पशून्यैर्मनोन्मनीमग्नधियो भवन्ति॥

नेत्राची उघडझाप (ज्यावर ध्यान करतात) तसेच रेचक पूरक संपतात मनाचे संकल्प विकल्प शून्य होतात व मनोमनी मग्न होऊन जातो.

उन्मन्यवस्थाधिगमाय विद्वन्नुपायमेकं तव निर्दिशामः। पश्यन्नुदासीनदृशाप्रपञ्च सङ्कल्पमुन्मूलय सावधानः॥

उन्मन अवस्थेत जाण्यास विव्दानांनी सांगितले उपाय तुझे मार्गदर्शन करतील.दृश्य व प्रपंच ह्याचे दास्यत्व संपून संकल्पाच्या मुळापासून सावधानता येते.

नन्दिकेश्वरतारावल्याम् - नंदीकेश्वर तारावली

अन्तर्लक्ष्यंबहिर्दृष्टिर्निमेषोन्मेषवर्जितः। एषासाशांभवीमुद्रा सर्वतन्त्रेषु गोपिता॥

अंर्तलक्ष बाह्यदृष्टि व क्षणांच्या बदलावरील ध्यान (श्वास व उच्छ्वास ह्यांच्या मधील काळावर ध्यान) न करता शांभवी मुद्रा सर्वांना गोपनीय अशी करावी.

शिवयोगे - शिवयोगे

लक्ष्यलीनमनसा निलेन यो वर्तते चलित तारको भवेत्। खेचरीगमय शैवशांभवी मुद्रया सततयाजगद्गुरुः॥

आकाशात लक्ष लावले असता निळेपण दिसते,तारका चालल्याप्रमाणे आहेसे वाटते. जे जगद्गुरू आहेत (शिव) ते खेचरी व शांभवी मुद्रेत असतात.

आदिनाथः – आदिनाथ

विच्छिन्नसर्वसङ्कल्पो निश्शेषाशेषवर्जितः। स्वावगम्यो लयः कोऽपि जायते वागचोरः॥

सर्व संकल्प नाहीसे होऊन बाकी खात्रीने काही राहत नाही. जो स्वतः लय पावतो,त्यास ब्राह्मण जो अदृश्य आहे तो निश्चित प्राप्त होतो.

योगशांकरे - योगाशंकर

अन्तर्लक्ष्यविलीनचित्तपवनो योगी सदा वर्तते दृष्टया निश्चलतारया बहिरयःपश्यन्न पश्यन्नपि।

अंर्तलक्ष विलीन झालेला चित्त वायुरूप असलेला योगी नेहमी निश्चल असून बाह्य जगतात,सहज जाणून त्याचे उल्लंघन करतो.

मुद्रेयं खलु शांभवी भवति सा युष्मत् प्रसादाद्गुरो। शून्याशून्यविवर्जितं स्मरति यत्तत्वं पदं शाम्भवम्॥

खरोखरच शांभवी मुद्रा हा गुरुप्रसाद स्वतःच्या कुवतीनुसार प्राप्त होतो. शून्याभास व स्तंभन ह्यांना नाहिसे करून शांभवी मुद्रेचे स्मरण करावे.

गोरक्षः – गोरक्ष

सुषिरोज्ञानजनकः पञ्चस्त्राते स्समन्वितः। तिष्ठेत खेचरी मुद्रा तस्माच्छून्ये निरञ्जने॥

नाडी ही सुषिर(पोकळ)असून पंचभूताप्रमाणे आहे.खेचरी मुद्रेत काही काळ गेल्यावर शून्यात व नंतर निरंजन स्थितीत जातो.

सोमसूर्यद्वयोर्मध्ये निरालम्बन्तले पुनः। संस्थिता व्योमचक्रे या सा मुद्रा नाम खेचरी॥

सूर्य चंद्र ह्या दोन्हीच्यामध्ये एक स्थान आधाररहित आहे तेथे आकाशचक्रात स्थित होणे यास खेचरी मुद्रा असे नाव आहे.

प्रणवचिन्तामणौ - प्रणव चिंतामणी

सा मया विदिता या माया साक्षाच्छिववल्लभा। पूरयेन्मारुतं दिव्यं सुषुम्ना पश्चिमे मखे॥

आता मी सांगितलेली माया ही प्रत्यक्ष शिव-विष्णु रूप आहे सुषुन्मेच्या पश्चिम मुखात दिव्य वायूरूप आहे.

पुरस्ताच्चैवपूर्येत निश्चितं खेचरी भवेत्।निरालम्बे मनश्शून्ये व्योमचक्रे व्यवस्थिते॥

प्रथमदर्शनी निश्चित खेचरी प्राप्त होते. निरालंब (आधार रहित) स्थितीत मन शुन्य होऊन आकाश चक्रात स्थित होते.

निरालम्बं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयत्। कर्पूरमनले यद्वत् सैन्धवं सलिले यथा।

सदा संदीयमानञ्च मनस्तत्वं विलीयते ॥

आधार रहित मन करून किचिंत विचार चिंतन करू नये.जे मन समुद्राच्या लाटेप्रमाणे बदलते ते कापरा सारखे उडून जाते.

लयोलय इति प्राहुरीदृशं विद्धि लक्षणम्।अपुनर्वासनोत्थानं लयमित्युच्यते बुधैः ॥

लयात लय म्हणजे असे लक्षण आहे ज्यात दृश्याचा भेद करून त्याग होतो,पुनःपुन्हा त्याचे अस्तित्व निर्माण होत नाही म्हणून लय करणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण आहे.

परमेश्वरेण कुण्डल्या सहराजयोगं कुण्डलिनी प्रकरणे उच्यते ॥

परमेश्रवराचे कुंडली सहराजयोगातील कुंडलिनी प्रकरण उत्तम आहे.

॥ इति यागे सारसंग्रहे राजयोगस्वरूपनिरूपणं नाम एकादशोध्यायः ॥

असा योगसार संग्रहातील राजयोग स्वरूपनिरुपण नावाचा अकरावा अध्याय समाप्त झाला.

विघ्नशांती अध्याय

एवमभ्यास शीलस्य विघ्नाः प्रादुर्भवन्ति हि। वातपित्तादि रागैश्च भूताद्यैर्विविधानि च ॥

विघ्नांचे स्वरूप हे अभ्यासावर अवलंबून आहे,वात,पित्तरूप रोग भूतमात्रात विविध आहेत.

तदुक्तं योगशांकरे - योगशंकर

प्रथमाभ्यास काले तु विघ्नास्युर्विविधा मुने।आलस्यं प्रथमो विघ्नः दुस्सङ्गश्च द्वितीयकः।
मन्त्राणां साधनं ज्ञेयं तृतीयो विघ्नसंभवः ॥

प्रथम अभ्यास करताना हे मुने अनेक विघ्ने आहेत,आळस प्रथम,वाईट संगत दुसरे,मंत्रांच्या साधनांचे ज्ञान हे तिसरे विघ्न संभवते.

चतुर्थो धातुवादः स्यात् पञ्चमं काव्यकल्पना। उपसर्गाः प्रवर्तन्ते दृष्टस्यात्मनि योगिनः ॥ काम्यक्रियास्तथा कामान् मानुषानभिवाञ्छति। स्त्रियोदानफलं मायां विद्यारूपं धनं दिवः ॥

चवथे धातू,(नाडीतील) पाचवे स्वतःच्या कल्पना (काव्यासारख्या) जे दृष्टीला दिसेल त्याचा उपसर्ग (संसर्ग) कामवासना व क्रिया मनुष्यास असतात. स्त्रीदान म्हणजे मायाच होय.(स्त्री म्हणजे माया) व स्वर्ग हे विद्यारूप धन आहे.

देवत्वममरेशत्वं रसायनवधः क्रियाः। मरुत्प्रपतनं यज्ञो जलाग्न्यो रुपसेचनम्॥ श्राद्धान्नादी निदानानि फलानि नियमास्तथा ॥

देवत्व मी-माझेपणा व व्यसन म्हणजे स्वतःचा वध करण्याजोगे आहे.ज्याने मरुत उर्ध्व होण्याऐवजी उलट होईल,असे कर्म,जल व अग्नीचा वापर श्राद्ध निदान व त्याची फळे व नियम.

ततोपवास पूर्वञ्च देवताभ्यर्थनानि च तेभ्यस्तेयस्स्वकर्मयः उपतृष्णाभि वाञ्छितम्।
चित्तमित्थं प्रवृत्तं तु यत्नाद्योगी निवर्तयेत्। ब्रह्मसङ्गिमनः कुर्वन् उपसर्गाद्विमुच्यते ॥ इति।

पूर्वी देवतांचे ठरलेले उपवास व त्यासाठी करावे लागणारे कर्म व त्याच्या फळाची तृष्णा (इच्छा),चित्त व इतर जागी प्रवृत्त होणे असे संसारात लोक उद्योगात राहतात. ह्या साधेनेतील अडचणी आहेत,मन ब्रह्माकडे व त्यातील अर्धमात्रारुपी उपसर्गाकडे लावणे हे उत्तम होय.

मार्कण्डेये - मार्कंडेय

उपसर्गैर्जितैरेभिरुपसर्गास्ततः पुनः। योगिनः संप्रवर्तन्ते सत्वराजसतामसाः॥

उपसर्गापर्यंत पोहोचल्यावर पुन्हा रूप सर्गाकडे जातात.ज्याने रज तम सत्व गुण योग्यांना ओलांडावे लागतात.

प्रतिभाश्रवणो दैवो भ्रमावर्तौ तथापरौ।पञ्चैते योगिनो योगविघ्नाय कटुकोदयः॥

देवाची प्रतिमा व श्रवण ह्याने भ्रम वाढू शकतो,योग्यांसाठी हे विघ्न अतिशय खराब अनुभव देते.

देवार्थवाक्यशास्त्रार्थ विद्याशिल्पाद्यशेषतः। प्रतिभाति यदन्यच्च प्रतिपः स तु योगिनः।
शब्दार्था नखिलान् वेत्ति शब्दं गृह्णाति यच्चवै॥

ज्याप्रमाणे देवांनी सांगितलेल्या वाक्यांचा शात्रार्थ व विद्याज्ञान शिल्पात बाकी राहते,त्याचप्रमाणे प्रतिभा व अन्य योग्यांपासून दूर जातात.

यो जन्मानां सहस्त्रेयः श्रवणस्याभि धीयते। मासान्ताद्वीक्षते चाक्ष्णा देवयोनि गणादयः॥

सहस्र जन्मात वेदशास्त्र श्रवणाचा लाभ होतो एक महिन्यात चाणाक्ष (हुशार) असे देवयोनीतील गण दिक्षा प्राप्त करतात.

उपसर्गं तमप्याहुर्देवमुन्मत्तवद्बुधः। भ्राम्यते यन्निरालंबं मनो दोषेण योगिनः॥

ज्याप्रमाणे उन्मत्त बुद्धिमान देवांच्या वाट्याला,दु:ख (वाईट-दिन) येतात तसेच मनात दोष असलेल्या योग्यांना निरालंब अवस्थेचा भ्रम होतो.

समस्ताधारविभ्रंशो भ्रमरसपरिकीर्तितः।आवर्तयुवतो यस्य ज्ञानावर्तो यदाकुलः॥

सर्व आधारांचा भ्रम हा भ्रमर सारखा म्हणून प्रसिद्ध आहे. जसा ज्ञानी आपल्या कुळात त्याच जागी पुनःपुन्हा फिरतो.(ज्ञानाचा मोक्ष सापडत नाही)

चित्तनाशकृतावत्त उपसर्गस्स उच्यते। ततोऽभ्यास परित्यागं प्रथमं विघ्न उच्यते।
ततोऽभ्यास परित्यागं प्रथमं विघ्न उच्यते॥

चित्त विचलित झाल्याने (चित्तनाश) मोठ्या त्रासाला सुरवात होते,त्यामुळे अभ्यासाचा त्याग हे प्रथम विघ्न,हे लक्षण मुख्य आहे.

द्वितीयं संशयाख्यं च ततीयं च प्रमत्तता। आलस्यं च चतुर्थं स्यात् निद्राकोपं च पञ्चमम्॥ षष्ठं च विरतिर्भ्रान्ति दर्शनं सप्तमं स्मृतम्। विशेषं चाष्टमं चैव ह्यनाख्यं नवमं स्मृतम्॥

दुसरे संशय,तिसरे ममत्व,चवथे आळस,पाचवे निद्रा,सहावे भ्रांतीचा,अंत(ध्यास नसणे) सातवे आठवण आठवे विशेषपण सांगितले आहे.नववे मागचे आठवणे.

अलब्धभूमिर्दशमं गोरक्षेण प्रकीर्तितम्। सर्वत्रानुपपत्तौ च देशकाल विवर्जिते॥ असतां दर्शने योगं तस्मात् तु परिवर्जयेत्॥ इति॥

साधनेस योग्य भूमि न लाभणे असे लक्षण गोरक्षानी सांगितल्याचे प्रसिद्ध आहे,बाकी सर्व देशकाळ ह्यावर सोडावे दर्शन असताना (बाह्यदृष्टि) योग न करणे योग्य होय.

दत्तः। दत्त

न वेष्टधारिणं किञ्चित् कारणं न च तत्कथा। क्रियैव कारणं सिद्धिः सत्वमेतत्तु सांकृते॥

कोठल्याही थोड्या कारणासाठी सुद्धा बंधन नसणे व त्याच्या कथांपासून (कल्पने) सुद्धा दूर. अशा अवस्थेत शुभ व सत्वगुणात्मक सिद्धीचे कारण नसणे त्यास बंधन नाही.

शिश्नोदरार्थं योगस्य कथेयं वेष्टधारिणः।अनुष्ठानविहीनास्तु पञ्चयन्ति जनानिह॥

शिवणिजवळ धारणा असलेले योगी बंधनात आहेत. जे अनुष्ठानादी बंधनात अडकलेले जन आहेत.

उच्चावचैर्विप्रलोभैर्विन्दन्ति कुशलान्वितैः। योगिनो वयमित्येवं मूढाः कामपरायणाः।

शनैः शनैस्तान् यो ज्ञात्वा योगाभ्यासविवर्जितान्॥

मोठ्या दिसणाऱ्या गोष्टींचे प्रलोभन ज्ञान्यांना असून ते त्या शुभ कार्यात आहेत. योगीजनांतील काही मूर्ख असून मिथ्या कामात गुंतले आहेत.

कृत्वार्थवञ्चनैरेवं वञ्चयेद्वेषधारिणः। यतस्ते विघ्नभूतास्तु यागोभ्यासस्य सर्वदा॥ वर्जयेत्तान् प्रयत्नेन चेदृशी सिद्धिजाप्रयान्॥

व्देष करणारे असे कार्य करत आहेत जे योगाभ्यासासाठी एक विघ्न आहे.अश्या प्रदेशात प्रयत्नाने सिद्धी टाळाव्यात ज्यांचा नाश होईल.

योगसारमञ्जर्याम् - योगासार

भटभेदाश्च चत्वारो नदभेदास्तथैव च। अंगशोषः क्षुधालस्यं कण्डूर्देह विवर्णता।

भटस्य प्रत्ययास्त्वेते तेषां शृणु च भेषजम्॥

अनेक प्रकारचे सैनिक व नदया हे भेदाने भरलेले आहे. अशक्त व भुकेल्या देहाची अवस्था वाईट असते.म्हणूनच सैनिकाची चांगली अवस्था प्रत्ययास येते.

मनो निर्विषयं कृत्वा त्रिमासममरीरसम्। देहमुद्वर्त्तयेत् तस्य देहवृद्धिः प्रजायते॥

मन निर्विषय करावे ज्याने तीन महिन्यात देहवृद्धी होते.(रसाने देह भरून जातो)

त्रिरुद्वर्तनं कुर्यात् दिवारात्रं तथैव च। रसनामूर्ध्वमायोज्य वज्रकन्दपरोन्मुखीम्॥ तत्सुधांन्निहतस्सत्यं क्षुधालस्यं च नश्यति॥

त्यानंतर रुद्र आवर्तन दिवसरात्र करावे,कठीण अश्या कंदाच्या (मूलाधार ज्याचे तोंड उघडण्यास कठीण) उलट मुखात (नाडीच्या दुसऱ्या टोकास) रसरुपी अमृताची ऊर्ध्व (वर) व्यवस्था केली आहे.जे अमृतरूप आहे ते भूक नाहीसे करते.

तत्सुधाममरीं देवि गृहीत्वा चांगमर्दनात्। तच्छरीरविवर्णत्वं कण्डूत्वं च विनश्यति ॥

अश्या तऱ्हेने हे देवी अमृताने मृत्यू नाश व दात स्वच्छ होतात. तसेच अग्नीमुळे (उष्णतेने) शरीराचा त्रास नाहीसा होतो.

नट भेदाश्च चत्वारो बहुधा संस्थिताः प्रिये। नेत्र रोगाङ्ग रोगञ्च दाहो भ्रान्तिस्तथैव च ॥

नृत्य भेद हे सगळीकडे हे प्रिये अस्तित्वात आहेत तसेच नेत्र रोग,त्याचा दाह व भ्रांती (प्रत्येकाचा पाहण्याचा व त्याप्रमाणे कृतीचा दृष्टीकोन वेगळा आहे.)

भेदमेकं मया प्रोक्तं द्वितीयमधुना शृणु। तदन्तरुक्काल्प सत्वं देहलाघवनाशनम्।
तृतीय भेदञ्च तथा शृणु देवि महाज्वरः ॥

आता मी हे देवी दुसरे गोड भेद सांगतो,ज्याने काळानुरूप येणारे सत्वरूप असे देह सौंदर्याचे दोष नाहीसे होतात.महाताप असा तिसरा भेद हे देवी तुला सांगतो.

शिरोरुक्कोष्णभेदश्च जिह्वाभ्रान्तिस्तथैव च। वमनं कासदोषञ्च नेत्रान्धत्वं तथैव च ॥

शिरातील (डोके) स्वतंत्र (विचित्र) तापाने जिव्हेला भ्रम (भ्रांती) होतो. उलटी कफदोष व नेत्रांधत्व येते.

दुर्जया च तथा निद्रा तेषां शृणु च भेषजम्। स्वमूलोच्छखेवाससम्पन्नामूर्ध्वं कुण्डलिनां न्यसेत्।
निश्चलामूर्ध्वगां जिह्वां कृत्वा कुम्भकमाश्रयेत् ॥

निद्रेवर जय न मिळणे त्याचा उपाय ऐक.स्वतःच्या मुळात ऊर्ध्व अशी कुंडली संपन्न होऊन कार्य करते.

शक्तिक्षोभान्महादेवि ज्वलनादि प्रभेदतः। यदाशृणोति तन्नादं तदामुक्तस्स उच्यते ॥ इति

जागृत शक्ति ज्वलनाचा(अग्नीचा)भेद करणारी प्रलयकारी आहे,तिचा नाद ऐकणारे मुक्त असे उत्तम योगी होत.

चिन्तये मृतासक्तं स्वदेहं परमेश्वरि।अनेन देवि योगेन सर्वरोगैः प्रमुच्यते ॥

हे परमेश्वरी, आपला देह मृत आहे असे चिंतन करावे सर्व रोगांचा ह्या योगात नाश होतो.

अनेनैव विधानेन द्विमासान्तं यदा चरेत्। तदा शृणोति कणार्न्तं महागजरवध्वनिः ॥

वर सांगितलेल्या विधानाचे दोन महिने आचरण केले तर महागजर ध्वनी कानात ऐकू येतो.

पूर्ववच्चिन्तयेद्देहं द्वितीयैर्मुच्यते गदैः। त्रिमासान्ते सिंहनादं शृणोति परमेश्वरी ॥

पूर्वकर्मांचे विष दुसरी अडचण आहे तीन महिन्यात ति नाहिशी होऊन सिंहनाद ऐकू येतो.

तृतीयदोषभेदाश्च मुच्यते नात्र संशयः। मेघनादमघोराख्यं चतुर्थे मासि पर्यये ॥

तिसऱ्या दोषाचा भेद नि:संशय होऊन चार महिन्यात तिसरा दोष जाऊन रात्रीचा मेघनाद ऐकू येतो.

श्रुत्वा पूर्ववदभ्यस्य तुर्यदोषैः प्रमुच्यते। एवं स्थिरमतिर्ध्यानमभ्यसेच्च द्विकालकम् ॥ साधयेत् त्र्यब्दतस्सिद्धिर्जायते नात्र संशयः ॥ इति।

पूर्वी ऐकलेल्या गोष्टींमुळे तुर्य दोष मुख्य असतो,म्हणून दोन्ही वेळी मति स्थिर करण्यासाठी ध्यानाचा अभ्यास करावा.तीन वर्षात सिद्धी प्राप्त होते ह्यात संशय नाही.

दत्तः। दत्त

स्निग्धांयवागूमत्युष्णां पीत्वा तत्रैव धारयते्॥विघाते वचसो वाचां बाधिर्ये श्रवणेन्द्रिये। तथैवां पुफलं ध्यायेत् तृषार्तो रसनेन्द्रिये॥यस्मिन् यस्मिन् ऋजोदेशे तस्मिंस्तु कृषहारिणी॥

सिग्धपदार्थ चांगले त्यांच्या सेवनाने शरीर धारणेस उत्तम आधार मिळतो,फार बडबड करून परमेश्वरांने दिलेली वाचा नीट न वापरल्यास श्रवण इंन्द्रियाना बाधा येते. जीभ गोड पदार्थ खाण्यास व्याकूळ होते,लाळ गळते.ज्याप्रमाणे देश व ऋतु असेल तसे शरीर कृश राहिल असा आहार घ्यावा.

धारयेद्धारणामुष्णोशीतांशीते विदाहिनी। कीलं शिरसि संस्थाप्य काष्ठं काष्ठेन धारयेत्॥

वायुः काष्ठम्। कीलं कला। शनैः शनैः प्राणै धारणेनैव शान्तिः। लुप्त स्मृत स्मृतिः सद्यो योगिनस्तेन जायते द्यावापृथिव्यो वाय्वाग्नि व्यापिनावसुधाधरा॥ अमानुषा सत्वजाता बाधास्त्वेति च कीर्तिताः॥

उष्ण धारणा शित धारणेला दाह करते ,नख डोक्यावर ठेऊन काठीने काठी धरावी (लक्ष निश्चित करून कल्पनेने कल्पना धरून पुढे जावे) असा वायू वर न्यावा, ज्याने,ऐकलेले व मागच्यांनी सांगितलेले,ह्यांनी चटकन आपल्या लक्षाकडे योगीजन जातात,अश्याप्रकारे पृथ्वी वायू अग्नि आप व अमृत धारणा असलेल्या आकाशात सत्वगुण पराकाष्ठेला जातो. व योग्यांना ज्ञान प्राप्ति होते असे प्रसिद्ध आहे.

अमानुषां सत्वमन्तः योगिनं प्रविशेद्यदा। वाय्वग्निधारणाच्चैनं देहसंस्था विनिर्दहेत्॥

अतिशय सत्वगुणात (शुद्धसत्व) योग्यांचा प्रवेश होतो तेथे वायू अग्नि व देह ह्याची धारणा संपते.

एवं सर्वात्मना कार्यारक्षायोगनृपोविदः। धर्मार्थकाममोक्षाणां शरीरं साधनं यतः॥

असा सर्वांसाठी योगातील राजा(राजयोग)आहे,ह्या कार्याच्या व धर्माच्या साह्याने,शरीराने मोक्ष साधन प्राप्त होते.

प्रवृत्ति लक्षणाख्याता योगिनो विस्मयात् तदा। विज्ञानलयमाप्नोति तस्माद्गोप्य प्रवर्तयः॥इति मार्कण्डेय पुराणे गारेक्षः॥

प्रवृत्ति लक्षणांनी सांगितल्यास योगी विस्मयित होतात,विज्ञानाने लय केल्यास विचलित होणे थाबते.(चित्त विचलित शास्त्रशुद्ध मार्गाने होत नाही) असे मार्कंडेय पुराणात गोरक्ष म्हणतात.

प्रस्वेदो जायते पूर्वं मर्दनं तेन कारयेत्।ततोऽपि धारणाद्वायोः क्रमेणैव शनैः शनैः॥

प्रथम मोठ्या प्रमाणात वायू घेऊन नाडी शुद्धी करावी परंतु त्यानंतर हळूहळू श्वास उच्छवासाने धारणा क्रम अनुसरावा.

कम्पो भवति देहस्य चासनस्थस्य योगिनः। ततोधिकतराभ्यासात् दर्दुरी जायते भृशम्॥ ध्रुवम्॥

आसनस्थ योग्यांना देहात कंप उत्पन्न होतो,त्यानंतर कठीण अभ्यास अतिशय जलद शक्य होऊन आपल्या लक्षाकडे जाता येते.

यथा च दर्दुरो गच्छेदुत्प्लुत्योत्प्लुत्यभूतले। पद्मासनस्थितो योगी तथा गच्छति भूतले॥

ज्याप्रमाणे भूतलात डुंबणे (जाणे) कठीण असते,तेथे पद्मासन स्थित असलेला योगी सहज जातो.

ततोऽधिकतराभ्यासात् भूमित्यागश्च जायते। पद्मासनस्थ एवासौ भूमिमस्पृश्य वर्तते॥

तसेच अधिक अभ्यासाने भूमित्याग होतो,पद्मासन स्थित असलेला योगी भूमीला स्पर्श न करता राहतो.

निराहारो विचित्रं हि तथा सामर्थ्यमुद्भवेत्। अल्पं बाहुबलं भुक्त्वा योगीनव्यथते तथा॥

विचित्र निराहाराने बळ कमी झालेला योगी सामर्थ्यवान होतो व सर्व व्यथा दूर होतात.

अल्पमूत्रपुरीषः स्यादल्पनिद्रा च जायते। कीटो वा मूषिका लूता स्वेददुर्गन्धता नने॥ एतानि सर्वदा तस्य न जायन्ते ततः पुनः॥

मुत्र व मल कमी होतात निद्रा कमी लागते व गती वाढते किटक कोळी उंदीर ह्याची दुर्गंधी नाहिशी होते.व एकदा प्राप्त केलेले नाहीसे होत नाही.

ततोऽधिकतराभ्यासात् बलमुत्पद्यते भृशम्। येन भूचर सिद्धस्य भूचराणां गजक्षमः।
व्याघ्रो लुलायोऽप्यश्वोवा गवयो गज एव वा॥

त्यानंतर अधिक अभ्यासाने प्रचंड बळ येते व हत्तीसारखे बळ येऊन जमिनीवरील प्राण्यांवर ताबा येतो.

सिंहो वायोगिना तने म्रियते हस्तताडिता। कन्दर्पस्य यथारूपं तथा तस्यापि योगिनः।
तस्मिन् काले महाविघ्नो योगिनः स्यात् प्रसादतः। तद्रूपविवशानार्यः कांक्षन्तेऽस्यसमागमम्॥

सिंह व वायूच्या वेगाने रोगांचा नाश होतो (सुरुहोण्याआधीच नाश) त्यामुळे शरीर सुदृढ होते त्यानंतर कालरूपी महाविघ्ने योग्यांच्या व्दारी उभी राहतात,विवशशक्ति (कुमकुवत) डोके काढण्यास आतुर असतात.

यदिसङ्गं करोत्येवं बिन्दुस्तस्य विनश्यति। आयुः क्षयो बिन्दुहानिरसामर्थ्यं च जायते॥ तस्मात् स्त्रीणां सङ्गवर्जं कुर्यादभ्यासमादरात्। योगिनोंगेषुगंधः स्यात् सततं बिन्दुधारणात्॥तस्मात् सर्वप्रयत्नेन बिन्दू रक्ष्यो हि योगिनाम्॥

तेव्हा(स्त्री)संग केल्यास बिंदूचा नाश होतो व वार्धक्य वाढून बिन्दुमुळे(नाशाने)सामर्थ्य जाण्याचा धोका असतो.म्हणून स्त्रीसंग अजिबात टाळावा व अभ्यास करून सतत बिंदूधारणा करून गंधमय व्हावे व सर्व प्रयत्न करून बिंदूचे रक्षण करावे.

प्रणवचिन्तामणौ - प्रणवचिंतामणी

तथा च व्याधिभिस्त्यक्तस्तथा प्राणेजिते तथा। स्वेच्छया वर्तते देह आसनोदुच्चलिस्यति॥

तसेच व्याधी व प्राण ह्यावर विजय मिळतो,देह स्वइच्छेने वागतो त्याने आसनसुद्धा हलणारे होते.

यावदासनमुत्सृज्य देहो व्योम न चाश्रयेत्। यावद्रोगाश्च विघ्नाश्च संभविष्यन्त्यनेकथा॥

जरी आसन हलणारे झाले तरी आकाशात ते राहत नाही असे योगातील भविष्यातील विघ्न कथा सांगतात.

नागाः सुरेन्द्रकन्याश्च यक्षिण्यो सिद्धकन्यकाः। प्रार्थयिष्यन्ति ते देविहृच्छ्रयेण भृशातुराः॥

नाग व इंद्र ह्यांच्या कन्या ह्या देवांतील सिद्ध कन्या आहेत.हृदयातील त्यांची प्रार्थना हे देवी,लवकर शक्तिप्राप्ति साठी करतात.

शृणोति दिव्यवार्तां च दिव्यदर्शनमेव च। रसायनाद्यौषधं च स्वयमेव प्रवर्तते॥

ज्याने दिव्य शब्द दिव्य दर्शन व रसायन आणि ओषधी स्वतःच प्राप्त होते.

नृपाश्च पृथिवी दानैः बहुमानैश्च पुष्कलाः। योगिनः संप्रवर्तन्ते विघ्नार्थमितरेऽपि च॥

राजा अनेकांना पृथ्वीदान करून पुष्कळांना सन्मान देतो,योगीजन योगातील विघ्न टाळण्यासाठी राजाकडे जातात.

यस्याज्ञा वर्तते देवि देवतिर्यङखेनरादिषु। एवं प्राप्तान् महाभोगान् देवासुरमहीभुजः॥

तृणवत्तांस्त्यजन्योगी स परां सिद्धिमाप्नुयात्॥ इति।

अशी आज्ञा देवांनीच हे देवी राजा व योग्यांना दिली आहे. अश्या तऱ्हेचा महाभोग देव व असुर राजांना प्राप्त झाला आहे.

धारणायां च सिद्धायां योगिनो यत तेजसः। विघ्नार्थमभिवर्तन्ते गुह्यका बलिकामुकाः॥

तेजस्वी किवा तेजाची,सिद्धयोगी धारणा करतात. विघ्न गुप्तपणे लहान भांड्यातील झाडाप्रमाणे वाढतात व येतात.

योगसारमञ्जर्याम् - योगसार

अन्यथा वर्तमानस्य विघ्नं कुर्वन्ति दारुणाः। रोगे बर्हुविधैर्देवि श्रमजैर्निद्रया तथा॥

नाहीतर वर्तमान अवस्थेत भयंकर विघ्नांची सुरवात होते. हे देवी, अनेक रोग श्रम व निद्रा हे सुद्धा होतात.

प्रतिबन्धश्चै विविधैरविश्वासैश्च जृंभणैः। तस्मात् तेषां बलिं दद्यात् यथावन्नियत्तात्मवान्॥

जन्मापासून विविध विश्वास (भ्रम) असलेल्याचा निरोध करावा. त्याचप्रमाणे जो आत्मशक्तीच्या बरोबर आहे अश्या पूर्व दोषांचे सुद्धा हवन करावे.

एककालं द्विकालं वा त्रिकालं वा बलिंक्षिपेत्। अर्धरात्रे विशेषेण तद्यथा शृणुपार्वति॥

एकाच वेळी सर्व किंवा दोन वेळी (दोनदा) किंवा तीन (तीनदा) वेळी सर्व असणारे दोष,मुख्यत्वे अर्धरात्रीचे दोष हे देवी विसर्जन करावेत.

एकान्ते विजने देशे कृत्वा मण्दलमुत्तमम्। ऐं व्यापकमण्डलाय ऐं। इति सकृद्दद्यात्॥

एकांतात निर्जन जागी उत्तममंडल करावे जेथे सांगण्यासारखे फक्त व्यापकमंडल हेच असावे.

चतुरश्रं महेशानि मण्डलं कुसुमाक्षतैः। तत्र मण्डलमाधाय साधारं पत्रमुत्तमम्॥

महेशाचे चौकोनी मंडलरुपी कमळ पूर्ण होत नसेल तर पत्र (पान) ह्याचा आधार असलेले मंडल योग्य होय.

अर्धान्नं पूर्णसलिलं सपुष्पं साक्षतं गुहे। बलिं दद्याच्च मन्त्रेण तर्जन्यासंप्रतर्पयेत्॥

पूर्ण व अतिशय आनंदाने अर्धेअन्न ह्याचा पुष्पासहित नैवेद्य दाखवावा तसेच तर्जनीने अर्ध्य सोडून त्याचा त्याग करावा.

सर्वभूतेय इत्यन्ते हुंकारं सम्यगुच्चरेत्। स्वाहान्तोऽयं महामन्त्रस्तारपञ्चकसंपुटः॥

सर्व भुतांसाठी हुंकार हा साधारण उच्चार आहे पंचकाचे आवरण असलेला महामंत्र आहुतीसाठी वापरावा.

सर्वविघ्नविधातार्थमीरितः प्रथमं प्रिये। पूर्वस्यां दिशिभूतांश्च भूतनाथं च तर्पयेत्॥

सर्व विघ्नविधाता प्रथम प्रिय आहे,त्यासाठी पूर्वेस भूतांचा नाथ शिव ह्याचे तर्पण करावे.(ह्यास प्रसन्न करावे)

दक्षिणे सकलान् यक्षान् यक्ष कन्याश्च तर्पयेत्। पश्चिमे राक्षसान् बाले तथा राक्षस योषितः॥

दक्षिणेकडे यक्षांचे स्थान आहे,त्यासाठी यक्ष कन्यांना प्रसन्न करावे.

उत्तरे क्षेत्रपालं च तत्कन्याश्च प्रतर्पयेत्। ऊर्ध्वायां दिशि देवांश्च देवकन्याश्च तर्पयेत्॥

उत्तरेकडे क्षेत्रपाल आहेत,त्याच्या कन्यांना प्रसन्न करावे.

मध्ये चराचरगुरुमीश्वरं भुवनैः सह। तत्र त्यान्योगिनी क्षेत्रनाथान् गुणकानपि॥

मध्यभागी चराचराचा गुरु ईश्वर सर्व भुवनांसह आहे,तेथे त्या क्षेत्रातील योगिनी नाथांचे(शिव)गुण गावेत व ऐकावेत.

तर्पयेत् पञ्चभूताद्यैर्भावयेत् परिवेष्टितम्। तत्परामृतसन्तृप्तं भावयेत् स चराचरम्॥

पंचभुतांना प्रसन्न करून त्यांना भक्तिभावाने आपलेसे करावे त्यानंतर परम अमृतरूप चराचरां विषयी भाव धरावा.

अनेन बलिनातृप्ता योगिनः सिद्धिमुत्तमाम्। दिशन्ति भूतनाथास्ते चान्यथा विघ्नयन्ति च॥

अनेक बलशाली सिद्धिंनी योगी तृप्त होतात. योगाचे ज्ञान देणारे भूतनाथ असून त्यांच्याशिवाय साधना म्हणजे विघ्नच आहे.

तस्मात् सर्वप्रयत्नेन बलिं दद्याद्विचक्षणः। ततो यत्नं प्रकुर्वीत मन्त्रयोगस्य योगवित्॥ इति।

प्राणायामने योगशान्ति प्रकार उच्यते॥

त्यासाठी सर्व प्रयत्नांनी अश्या क्षणांना दूर सारावे.तसा यत्न करून योगमार्गाने मंत्रयोगाची सुरवात करावी.

प्रणवचिन्तामणौ - प्रणवचिंतामणी

जिह्वया वायुमाकृष्य यः पिबेत् सततं नरः ।श्रमदाह विनिर्मुक्तो भवेन्नीरोग भाकखे क्रमात् ॥

जिव्हा ही वायुला आकृष्ट करते,त्यामुळे नर नेहमी वायू पितात(घेतात) मुक्तानां श्रमदाह होत नाही, तसेच रोगरहित शरीर क्रमशा होऊन तेजस्वी होते.

जिह्वया वायुमाकृष्य जिह्वामूले निरोधयत्े। पिबेदमृतमव्यग्रं सकलं भद्रमश्नुते ॥

जिव्हा ही वायुला आकृष्ट करते,म्हणून वायूचा जिव्हेच्या मुळात निरोध करावा.जे वाईट आहे ते सोडून शुभ ऐकावे.

इडया वायुमाकृष्य भ्रुवोर्मध्ये निरोधयेत्। यः पिबेदमृतं शुद्धं व्याधिभिर्मुच्यते नरः ॥

इडेने वायुला आकृष्ट केलेले,त्याचा भृवात निरोध करावा.जे वाईट आहे ते सोडून शुभ घ्यावे व व्याधी नाहीश्या कराव्या.

नाडिभ्यां वायुमाकृष्य नत्रे द्वन्द्वे निरोधयेत्। नेत्ररोगा विनश्यन्ति तथाश्रोत्रे निरोधयेत् ॥

नाड्यांनी वायुला आकृष्ट केलेले,त्याचा दोन्ही नेत्रात निरोध करावा,ऐकलेल्याचा निरोध केल्यास नेत्ररोग नाहीसा होतो.

श्रोत्ररोगाविनश्यन्ति प्राणायाम बलेन तु ।तथा वायुं समाकृष्य धारये च्छिरसिस्फुटम् ॥
शिरो रागो विनश्यन्ति सत्यमुक्तं बृहस्पते ॥ इति

कानाच्या रोगांचा विनाश करण्यासाठी बळाने प्राणायाम करावा.व सूक्ष्म शब्द उच्चार वायुरूपात धारण करावा.

सूतसंहितायाम् – कुलार्णवेच - सुतसंहिता कुलावर्ण

ब्राह्मे मुहूर्ते अथवा संध्याकलेषु वा पुमान्। जिह्वया वायुमाकृष्य यः पिबेन्मन्त्रपूर्वकम्।
त्रिमासात् तस्य कल्याणि वाक्सिद्धिर्जायते ततः ॥

ब्राह्ममुहूर्त अथवा संध्याकाळी वा पुरुषाला जिव्हा वायू आकृष्ट करत असेल तर मंत्राचा पूर्व म्हणून वायू प्यावा (घ्यावा) तीन महिन्यात हे कल्याणी वाक सिद्धी मिळते.

काकचञ्चुपुटेवाथ पिकचञ्चु पुटेन वा। यः पिबेत् पवनं योगी सर्वरोगैः प्रमुच्यते ॥

ज्याच्यामुळे सर्व संरक्षित आहे,त्यासाठी योगी वायुं पिऊन सर्व रोगांपासून मुक्त होतात.

षण्मासाभ्यासयोगेन सर्वरोगैः प्रमुच्यते। आत्मन्यात्मानमिलया कुण्डल्या यस्तु धारयेत्।
क्षयरोगादयश्चापि नश्यन्ति त्रिदशार्चिते ॥

सहामहिन्याच्या अभ्यासाने सर्व रोगांचा नाश होतो. आत्म्याचे परमात्म्याशी मिलन करण्यास कुंडलीची धारणा होते. क्षय रोगांसारखे रोग तेरा वेळच्या अर्चनाने संपतात.

नासाभ्यां वायुमारोप्य नाभौ तन्दुस्यपार्श्वयोः। यो वहे देक घटिकां व्याधिभिः सोऽपि मुच्यते ॥

नासिकाग्रात वायूचे रोपण केल्याने नाभीच्या मागील भागास आराम होतो. त्या घटिका हया सुखाचा शिडकाव करतात.

मासमेकं त्रिसन्ध्यासु जिह्वयारोप्यमारुतम्। यः पिबेत् त्रिदशाहारं धारयेत्तुन्द मध्यमे ॥

महिन्याने त्रिवेणीतील वायू जिव्हेच्या तेथे धारण करावा. व तेरा अगुंले वायू पिऊन मध्यमेत धारण करावा.

गल्म प्लीहोदरस्लिष्ट त्रिदोषजनितान्यपि। तुन्दमध्यगतारागोः सर्वे नश्यन्ति योगिनः ॥

नक्कीच प्लिहा पोट आतडे ह्यात (कफ,वात,पित्त) तिन्ही प्रकारचे दोष असतात.ते योग्यांचे पोटातील सर्व रोग नाश पावतात.

ज्वराः सर्वे विनश्यन्ति श्लेष्माणि विविधान्यपि। शिवै किं बहुनोक्तेन वलीपलितनाशनम्॥

एवं वा विजयोपायं प्राणस्य तु वरानने ॥ इति॥ रागेशन्ति मन्त्रमुपासनाक्रमश्चोच्यते

विविध ताप व थुंकी ह्यांशी निगडीत सर्व रोग विनाश पावतात. बहुतेक करून वार्धक्य व सुरकुत्या नाहीश्या होतात. ह्याप्रकारे हे पार्वती प्राणावर विजय मिळतो तसेच रोगांनाशासाठी मंत्र उपासना उत्तम आहे

योगसारमञ्जर्याम् - योगासार

आग्नेय्यां धारणाद्योगे रोमेवारुणधारणा।मूर्छायामभिघाते वा भूते प्रेताद्युपद्रवे। प्रजपेद् वैद्यनाथार्णं विषदोषे च दारुणे ॥

आग्नेय दिशेने धारणेचा उद्योग केल्यास रोमात वायुधारणा होऊन बेशुद्ध पडणे किवा भुतप्रेत ह्यांचा उपद्रव होतो.वैद्यनाथ (शिव) जप अश्या विषारी रोगांसाठी करावा.

सर्वरोग प्रपीडासु सद्यो योगी सुखी भवेत्। पिनाकी पीठगोमेदस्तथापावकमारुतौ ॥

सर्व रोगांची त्याने पिडा जाऊन योगी सुखी होतो. धनुष्यावर(आज्ञा)एक पवित्र पिठ असून तेथे वायू मारुत रुपात आहे.

सार्पी स बिन्दुमद्बीजं मुच्चरेद्रोग नाशनम्। जायन्ते वैद्यशब्दं च मेषो दण्डी च दण्डिनौ ॥

दोन बिंदुचे सर्परूप असून रोगनाशासाठी उत्तम आहे.तेथे शिव(वैद्यनाथ)शब्द प्रवेश करून ज्यास शासन करायचे त्यास शासन करतात.

व्योमसूर्याग्नि जायन्ते तारयोगान्महामनुः । षडखेदीर्घस्वरयुक्तेन बीजन्यासं स मुच्यते ॥

आकाशात सूर्याच्या अग्निरूप तेजासारख्या ठिकाणी अतिशय बुद्धिमान पोहोचतात,सहा दिर्घस्वर युक्त बिज-न्यास सर्वात उत्तम.

प्रदृश्यामृतमुद्रां च मन्त्रेण व्यापयेत् तनुम्। कुन्देन्दु स्फटिका मलं त्रिणयनं दिव्यामृताच्छं घट्ं
बिभ्रद्दक्षकरे तथेतर करे सर्वौषधीनां रसैः। पूर्णं पात्रवरं दधत्स्व शिरसि श्रीवैद्यनाथं प्रभुं
ध्यायन् व्याधिगणैः क्षणेन मनुजो मुक्तश्चिरं जीवति ॥

शवासन मुर्द्रेने व मंत्राने सर्व देह व्यापावा (पूर्णदेहासाठी हे करावे) दिव्य (घट्ट) स्पटिकरूप द्रवाने पसरलेला मल निघून जाऊन दिव्य अमृताचा वर्षाव होतो.सर्व ओषधी रस असलेल्या वनस्पतींच्या

सर्व पानांचा श्री वैद्यनाथांना,शिरावर अर्पण करावा.व्याधींचा नाश करणाऱ्याचे स्मरण क्षणभर केल्याने माणूस जीव मुक्त होतो.

एवं ध्यात्वा जपेन्मन्त्रं सप्तसाहस्रमादरात्। मुच्यते सर्वरोगैश्च तथा भूताद्युपद्रवैः॥

अश्याप्रकारे ध्यानाने मंत्रजप सप्ततारकात केल्यास आनंद होतो व सर्वरोग तसेच भुतांचा उपद्रव नाहीसा होतो.

मन्त्र - मंत्र

लं वं रं यं ऊं स्वाहा – वैद्यनाथाय नं हं घ्रीं स्वाहा ओं॥ इति।

लं वं रं यं ऊं स्वाहा – वैद्यनाथाय नं हं घ्रीं स्वाहा ओं हा मंत्र जपावा

अथवान्य प्रकारेण देवं धन्वन्तरिं स्मरेत्।प्रजपेत् तन्मनुं सर्व व्याधि पीडा विनाशनम्॥

अशा प्रकरणी धन्वंतरी देवाचे स्मरण करावे,तनमनाने जप करावा ज्याने सर्व पिडा नाश होईल.

शुण्डिकाषायं पीत्वा सुस्निग्धं तद्धारणा बलात्। पूर्वोक्तमन्त्र स्मरणात् मुच्यते व्याधिभिश्शनैः॥

हत्तीच्या सोंडेचा रस प्यावा,जो गोड असून धारणा बळकट होते,आधीपासून मंत्र स्मरण उत्तम असल्याने व्याधींचा नाश होतो.

सर्वोपसर्गशान्त्यर्थं वेदमृत्युञ्जयं जपेत्। पञ्चस्वरासनगतो देवि(वी)शिवरासनः॥

सर्व नैसर्गिक गोष्टींची शांती करून वेदातील मृत्युंजय जप करावा. पाचही स्वरांसाठी जिव्हेचा वापर करावा.

बिन्दुमत्कादि सहितो भृगुस्तारादिरीरितः। मन्त्रो मत्युंजयो देवि महामृत्यु विनाशनः॥

ह्यात बिंदू (ध्यान) सहित,शुक्राचाही समावेश करावा मृत्युंजय मंत्राने हे देवी मृत्यूचा नाश होतो(टळतो)

त्र्यक्षरास्सर्वमन्त्राणां सुमहावीरहानलः। मन्त्रान्ते साध्य नामोक्त्वा प्रतिलोमेन चोच्चरेत्॥

सर्व मंत्र हे नाश पावणारे असून उत्तम मंत्रांची तीच स्थिति आहे.मंत्रांनी साध्य असलेले नामरूप असून मंत्र शेपटीसारखा लांब आहे.

पुटितः पञ्चतारेण सम्यग् बुद्धिः करस्थिता। दण्डिना भृगुणा कुर्यात् षडंगं विधिपूर्वकम्॥

पाच तारस्वरांनी आंदोलित बुद्धिने सर्व हाती येते. देहाचे सहा अंगांनी विधीपूर्वक नियमन(दंडित) करावे.

दश शत दल पद्मं कोटिचन्द्रावदातं् । करधृत वरमुद्रा पाशवेदाक्षसूत्रम्।

सहस्त्रकमळ कोटीचंद्रस्वरूप असून करांनी(हातांनी) सुंदर मुद्रा वेद ही सुत्रांतील साखळी आहे.

धृतशशधरखण्डोद्गीर्ण पीयूषवर्ष। प्लुतमिति परिभाष्य प्रोश्श्यते रोगजालैः॥

चंद्रापासून अमृत वर्षेच्या धारणेने रोगजालात फिरणाऱ्यास पायबंद होतो.

हृदय कमलमध्ये चन्द्रिकापूरमुक्ता। रजत कुमुदभासा सूक्ष्ममीशानमाद्यम्।

स्मरति यदि स रोगैर्विघ्न जालोपसर्गैः। प्रजनित कुभयाद्यैर्मुच्यते देवि योगी॥

हृदय कमळात मुक्त चंद्रपूर आहे. जे सोन्याच्या कमळांसारखे असून सूक्ष्म व पाहताच आनंद देणारे आहे.रोगव्याधी व त्रास ह्यासाठी त्यास स्मरावे ज्याने उत्तम कुंभक हे देवी योग्यास साध्य होतो.

गगन जलदभासा शूलखटखेवाङ्ग घण्टा। कुलिशवरकपाला भीतिहस्तारविन्दम्।
सकलदुरित भूतप्रेत कूश्माण्ड वर्ग। ग्रसन निरतमीशंध्यायतः स्यादभीतिः॥

गगनातून येणाऱ्या विविध आपत्तीनी कपाल भिल्ल ह्यांना नेहमीची भिती असते.सर्व वाईट अर्थात भूतप्रेतसमंधादि वर्गातील बाधा व भिती ह्यांचा नाश होतो.

प्रजपेदष्टसाहस्त्रं ध्यात्वैवं परमेश्वरम्। सर्वोपसर्गविघ्नाद्यै मुच्यते व्याधिभिः सह॥ इति।

सहस्त्रदलात असलेल्या परमेश्वराचे ध्यान करावे. सर्व व्याधी व संसर्ग व विघ्नांसाठी ते उत्तम होय.

मन्त्रस्तु मृत्युञ्जय त्र्यक्षरी। जपेदखेद्वादश लक्षन्तु य इदं मन्त्रमादरात्।
वलीपलित निर्मुक्तो ह्यजरा मरतां व्रजेत्॥

मृत्यंजय मंत्र तीन अक्षरी जपताना पापपुण्याच्या बारा अंगुलाना मंत्राचे लक्ष करावे.वार्धक्य व सुरकुत्या ह्यांनी मुक्त व जरामृत्यू ह्याचा नाश होतो.

पूर्वोक्तासनमभ्यस्य समासीनो जितेन्द्रियः। ध्यायेत् परतरं तत्वं निश्चले नान्तरात्मना॥

पूर्वीच केलेल्या अभ्यासाने जितेंद्रिय अवस्था प्राप्त होते. अंतरात परम तत्वाचे निश्चल ध्यान करावे.

सर्वविघ्न निवृत्त्यर्थं पूर्वं ध्यायेन् महावपुः। पाताल तल पादं च भुकटि व्योम देहकम्।
स्वर्गादिलोकशीर्षं च दिग्बाहुं देवतामयम्॥

ज्याची सुरवात होईल त्यासकट सर्वरोग नाहीसे होतात. पाय जमिनीवर असले तरी देह आकाशातच आहे वर असलेल्या देवता अनेक हात असलेल्या आहेत.

आदित्य चन्द्रनयनं क्षेत्रस्त्रग्विभूषणम्। समुद्रवसनं व्याप्तं ब्रह्माण्डपदमद्भुतम्॥

सूर्य चंद्राचे डोळे असलेला त्या क्षेत्राचे भुषण आहे जो समुद्रव्याप्त असून त्याच्या पायाशी भुतमात्र आहेत.

ब्रह्मादि तृणपर्यन्तं जगदेतच्चराचरम् । स्वरोमकूपकं ध्यायेत् स्वदेहञ्च जगम्मयम्।
एवं ध्यायेन्महारूपं देविचित्त स्थिराप्तये॥

ब्रह्मापासून तृण गवतापर्यंत चराचर जग आहे.स्वरांच्या सारखाच (ॐकार) असलेला देवच स्वदेहात आहे असे ध्यान करावे.(सर्व जग आपल्यात पाहावे)

इति प्रध्यायतस्सम्यकखे योगिनश्चित्तवृत्तयः। शनैर्निश्चलतामेति दिव्यज्ञान विचिन्तनात्॥

खोलवर अभ्यास करून योग्यांची चित्तवृत्ती पूर्णपणे शुद्ध होते श्वास-प्रश्वासाने निश्चल होऊन दिव्य ज्ञानाचे चिंतन करता येते.

एवं चित्तं स्थिरीकृत्य तच्चध्यानमुपक्रमेत्। ध्यायेत् स्वहृदये पद्मं शिवशक्त्यात्मकं परम्॥

असे चित्त स्थिर करून अनुक्रमे ध्यान करावे. स्वतःच्या हृदयकमळात शिवशक्तीचे ध्यान करावे.

तारकं शक्तिनालं प्रासाद मनकुर्णिकम्।अग्निमण्डल पत्राढ्यं सूर्यमण्डलकेसरम्॥

शक्तिच्या नाडीत (ब्रह्मनाडी) मनास ऐकू येणाऱ्या स्वरांचे मुख्य स्थान आहे. तसेच लालसर छटा असलेल्या सूर्याचे अग्निमंडल आहे.

सोममण्डल किंजल्कं पराप्रासादकर्णिकम्। शिवशक्तिसमायुक्तं चिन्तयेच्चिरमात्मवित्॥

सूर्यमंडलाचे किरण हेच त्या प्रासादाचे कर्ण आहेत. शिवासहित शक्तीचे आत्मस्वरूपात चिंतन करावे.

तन्मध्ये परमेशानं ध्यायेदात्मविशुद्धये। नीलजीमूतसंकाशं जटाबद्धमहोरगम्॥

विशुद्धरुपात त्यात परमेश्वराचे ध्यान करावे निळ्या (शिव) देवाच्या स्थानात जटेत सर्पिण (कुंडलिनी) शक्ति आहे.

बालेन्दुशेखरं भीमं हुकांरव्याप्तदिङखेमुखम्। खडखेगशूलाभयधरं नागपाशधरं विभुम्।
कपालघण्टासि महितं बिभ्राणं वरदं तथा॥ रक्ताम्बरधरं रक्तमाल्यं गन्धविभूषितम्॥

शिखावर बालसूर्य,भयकारक हुंकारव्याप्त शिव मुखं, नागपाश व शस्त्रधारी असा भीतीदायक,अश्या,शिरात असणाऱ्या शिवाची आराधना करतात,जो नेहमी वरदान देणारा आहे.जो रक्तवर्णी व रक्तमालेच्या गंधाने भूषित असा आहे.

नागाष्टकमहाहारं गर्जन्तं भयनाशनम्। व्याघ्रचर्मपरीधानं सिंहचर्मोत्तरच्छदम्॥

नागाचा आठ पदरी हार घालून भय नाशाची गर्जना करीत आहे. वाघाचे चामडे परिधान केलेला व सिंहाचे चर्म अच्छादून त्यावर बसला आहे.

नूपुरच्छन्नहारादि भूषणैः परिभूषितम्। सोमसूर्याग्नि नयनं दंष्ट्रा निष्टयूतपावकम्॥

(नटराज) नुपुरादि भूषणे भूषवत असलेला चंद्रसूर्यरूप डोळे असलेला वायुचे सहाय्य असलेला आहे.

ग्रसन्तमखिलं दोषविघ्नकोटि विभेदकम्। सर्वशत्रुक्षयकरं महामृत्युविनाशनम्॥

सर्व दोषांचा नाश व कोट्यावधी विघ्नांचा भेद करणारा. सर्व शत्रूंचा नाश करणारा व महामृत्युचा नाश करणारा आहे.

वलीपलित दौर्भाग्य जरारोगविनाशनम्। सर्वसिद्धिकरं देवं भैरवं भक्तरक्षकम्॥

वार्धक्य सुरकुत्या दुर्भाग्य व जरा रोग ह्याचा विनाश करणारा आहे. सर्वसिद्धी असणारा देव भैरव भक्त रक्षिता आहे.

माध्वीरससमापूर्णं नयनत्रयमण्डनम्। परमाह्लाद चेतस्कं सर्वलोक गुरुं हरम्॥

मधुर रसाने पूर्ण, तिन्ही नेत्र,त्या देवाचे सौदर्य वाढवितात. परम अल्हाददायी व बुद्धिरूप असा सर्वलोकांचा गुरु लक्ष वेधतो (हरण करतो)

